| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ३३ वा | शुक्रवार, दिनांक १७ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## विधानपरिषद निवडणुकीत उद्धव ठाकरे यांचा निर्णय गेमचेंजर ठरू शकतो

### निवडणूक बिनविरोध करण्याकडे सत्ताधारी भाजपचा कल

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर आता सर्वांचे लक्ष एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे लागले आहे की, उद्धव ठाकरे पुन्हा विधानपरिषदेच्या रिंगणात उतरणार का? त्यांच्या आमदारकीचा कार्यकाळ १३ मे रोजी संपत असल्याने ते पुन्हा सभागृहात येतील का, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर या चर्चेला अधिकच उधाण आले आहे.

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार राज्यातील ९ नियमित जागांसह एका पोटनिवडणुकीसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल आणि त्याच दिवशी संध्याकाळी निकाल जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांनी आपापली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

विधानसभेतील सध्याच्या संख्याबळाचा विचार केला तर भाजपला ५, शिवसेनेला २, राष्ट्रवादी काँग्रेसला १ आणि महाविकास आघाडीला १ जागा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, महाविकास आघाडीकडून उद्धव ठाकरे यांना



उमेदवारी दिली जाणार का, यावर संपूर्ण राजकीय समीकरण अवलंबून असल्याचे मानले जाते. पक्षांतर्गत पातळीवरही त्यांनी पुन्हा विधानपरिषदेत यावे, असा दबाव असल्याची चर्चा आहे.

उद्धव ठाकरे यांनी २०२० मध्ये विधान परिषद सदस्यत्व स्वीकारले होते. आता त्यांचा कार्यकाळ संपत असताना ते पुन्हा निवडणूक लढवतील का, हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. जर त्यांनी उमेदवारी दिली, तर निवडणूक बिनविरोध करण्याकडे सत्ताधारी भाजपचा कल राहू शकतो, असे संकेत राजकीय सूत्रांकडून मिळत आहेत. त्यामुळे त्यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, विधान परिषद निवडणुकीत विजयासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीकडे भाजपचे २३१, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ५७ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे ४० असे एकूण भक्कम संख्याबळ आहे. या आधारावर महायुतीचे ८ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. दुसरीकडे महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ ४६ असल्याने त्यांना एकच जागा निश्चित मिळू शकते, तर दुसऱ्या जागेसाठी अतिरिक्त १० मतांची गरज भासणार आहे, जी सध्या कठीण वाटते.

निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार २३ एप्रिल रोजी अधिसूचना जाहीर होईल, ३० एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. २ मे रोजी छाननी होणार असून ४ मे ही अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. १२ मे रोजी मतदान व मतमोजणी होणार असून १३ मेपर्यंत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईल. या सगळ्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंचा निर्णय केवळ त्यांच्या राजकीय भवितव्याचाच नाही, तर संपूर्ण निवडणुकीच्या समीकरणाचा गेमचेंजर ठरू शकतो.

## दिल्लीचे नवे नायब राज्यपाल तरनजीत सिंग संधूंचे थेट ट्रम्प यांच्याकडून विशेष अभिनंदन

नवी दिल्ली: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिल्लीच्या नायब राज्यपालपदी नियुक्ती झाल्याबद्दल माजी राजदूत तरनजीत सिंग संधू यांचे अभिनंदन केले आहे. संधू हे एक 'अनुभवी राजनैतिक अधिकारी' असून त्यांच्या कार्यकाळात भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर संधू यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, दिल्लीच्या नायब राज्यपालपदी नियुक्ती झाल्याबद्दल तरनजीत सिंग संधू यांचे मनःपूर्वक अभिनंदन! एक अनुभवी राजनैतिक अधिकारी आणि अमेरिकेतील भारताचे माजी राजदूत म्हणून त्यांनी दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी नेहमीच मोलाचे योगदान दिले आहे. दिल्लीच्या प्रगतीसाठी संधू यांचे नेतृत्व यशस्वी ठरेल, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.

तरनजीत सिंग संधू यांनी अमेरिकेतील भारताचे राजदूत म्हणून अत्यंत महत्त्वपूर्ण काळात काम पाहिले आहे. त्यांच्या कार्यकाळात भारत आणि अमेरिका यांच्यात दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारीला नवी दिशा मिळाली. संरक्षण करार आणि आर्थिक गुंतवणुकीच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली. तंत्रज्ञान आणि सुरक्षेच्या बाबतीत दोन्ही देशांनी एकत्र पावले उचलली. जागतिक राजकारणाच्या बदलत्या समीकरणांमध्ये संधू यांनी वॉशिंग्टनमध्ये बजावलेली भूमिका अत्यंत प्रभावी मानली जाते.

## लातूर शहर व ग्रामीण मतदार संघात एसआयआर मॅपिंगचे काम सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, राज्यात लवकरच विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर - स्पेशल इन्टेसिव्ह रिव्हिजन) कार्यक्रम सुरू होत आहे. या कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून २३४-लातूर ग्रामीण व २३५-लातूर शहर विधानसभा मतदार संघातील सर्व बीएलओमार्फत सध्या एसआयआर मॅपिंगचे कामकाज सुरू आहे. हे कामकाज कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने, दोन्ही मतदार संघांतील सर्व बीएलओ यांना दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत त्यांच्या नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर उपस्थित राहून मॅपिंगचे काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी २३५-लातूर शहर व २३४-लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सर्व मतदारांनी १६ एप्रिल २०२६ पासून सायंकाळी ५ ते ७ या वेळेत आपल्या संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित राहून एसआयआर मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## मनपाच्या मान्सुनपूर्व नाले सफाई मोहीमेस सुरुवात

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील मान्सुन पुर्व नालेसफाई करणे करिता मान्सून पुर्व आढावा बैठक महापौर जयश्रीताई सोनकांबळे,आयुक्त श्रीमती मानसी, यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली सदर बैठकीस उपायुक्त वसुधा फड सर्व क्षेत्रीय अधिकारी, स्वच्छता विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थितीत होते. सदर बैठकीमधील आदेशाप्रमाणे लातूर शहरातील ४ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मान्सून पुर्व नालेसफाईची मोहिम सुरू करण्यात आली असून माहे-मे अखेर पर्यंत शहरातील सर्व मोठे व छोटे नालेसफाईचे काम पुर्ण करण्यात येणार आहेत. सदर मान्सूनपुर्व नाले सफाईच्या कामाच्या नियंत्रणासाठी ४ मुख्य स्वच्छता निरीक्षक, १८ स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता कर्मचारी कार्यरत आहेत.

## अशोक खरातच्या निकटवर्तीयाचा ट्रकखाली चिरडून मृत्यू, शिवनिका ट्रस्टचे होते उपाध्यक्ष!

**मुंबई/प्रतिनिधी :** उभ्या कंटेनरला जितेंद्र शेळके यांच्या कारने पाठीमागून धडक दिली. कार थेट कंटेनरखाली घुसली. अपघातात जितेंद्र शेळकेंचा मृत्यू तर पत्नी आणी मुलगा गंभीर जखमी झाले. जखमी मुलाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पत्नी अजूनही गाडीत अडकलेली आहे.

खरातच्या शिवनिका ट्रस्टचे शेळके उपाध्यक्ष राहिले होते. शेळकेंच्या लॉन्समध्येही खरातची भागिदारी होती. खरातला अटक झाल्यापासून जितेंद्र शेळके तणावात होते.

भोंदू खरातचा राहता समता पतसंस्थेतील बनावट खात्यांच्या तपासात समोर आलेला २१ ४९ ७१ पॅटर्न सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. पोलीस तपासानुसार, भोंदू अशोक खरातने राहाता येथील समता पतसंस्थेत ५७ जणांच्या नावावर तब्बल १०० खाती उघडली होती. ही सर्व खाती कोविड दरम्यान फक्त २१ तारखेला उघडण्यात आली. तपासात आढळलेल्या माहितीनुसार, अनेक खात्यांमध्ये ७१ लाख आणि ४९ लाख रुपये अशाच ठराविक रकमा वारंवार जमा केल्या आणि काढण्यात आल्या. विशेष म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या नावावर दोन खाती उघडली होती. या सर्व खात्यांमध्ये अशोक खरातचेच नाव 'नॉमिनी' म्हणून नोंदवले गेले होते. अंकशास्त्रावर विश्वास ठेवणारा अशोक खरात हा व्यवहारांमध्येही ठराविक अंकांचा वापर करत होता का, की हा केवळ आर्थिक व्यवहार लपवण्याचा तांत्रिक फॉर्म्युला होता, याचा तपास आता पोलीस करत आहेत.

अशोक खरातचे लैंगिक शोषण प्रकरण उघडकीस आल्यानंतर खरातचे पाप कुणाचे यावरुन आरोप प्रत्यारोप सुरु झालेत. अशोक खरातचे अनेक पोलीस अधिकारी भक्त असल्याचा आरोप अंजली दमानियांनी केला होता. त्यानंतर आता जलसंधारणमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नाशिक पोलिसांवर गंभीर आरोप केलेत. नाशिक पोलिसांच्या हलगर्जीपणामुळं खरात मोकाट सुटल्याचा आरोप विखे पाटलांनी केला. खरातच्या अनेक तक्रारी पोलिसांकडं आल्या असतानाही कारवाई का झाली नाही असा सवाल विखेंनी उपस्थित केला आहे. नाशिक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर एकट्या विखे पाटलांनीच प्रश्नचिन्हं निर्माण केलेले नाही. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी आयजी दत्तात्रेय कराळे यांनी खरातसोबत एका व्यासपीठावर लावलेल्या हजेरीवरुनही प्रश्नचिन्हे निर्माण केले होते. नाशिक पोलीस दलात अशोक खरातबाबत सहानुभूती असलेले काही बडे अधिकारी आहेत का असा प्रश्न विखे पाटलांच्या टीकेमुळं उपस्थित झालाय. दुसरीकडे अशोक खरातचे राजकीय लागेबांधे कुणाकुणाशी आहेत हे बाहेर यायला हवे अशी मागणीही विखे पाटलांनी केले आहे.

## प्रभात किरणे

दूषित मन, धर्म,जात
आवडे सर्वांना चिटकून
का बसावे चुकीच्या
रुढीना नसे आधार,
संकटातील माणसांना
करावे विचार,सत्य
असत्य जगताना

-इंजि. नागनाथ
कलवले लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## लातूर येथे नवीन जिल्हा रुग्णालय इमारतीचे १८ एप्रिल रोजी भूमिपूजन

- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होणार भूमिपूजन
- सहकार मंत्री बाबासाहेब पाटील भूषवणार अध्यक्षपद

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत लातूर येथील १०० खाटांच्या नवीन जिल्हा रुग्णालय इमारतीचे बांधकाम करण्यात येणार असून, या नवीन वास्तूचा भूमिपूजन समारंभ शनिवार, १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. नांदेड रोडवरील कृषि महाविद्यालय परिसरात हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आरोग्य विभागातर्फे देण्यात आली आहे.

नवीन वास्तूचे भूमिपूजन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील राहणार आहेत. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर उपस्थित राहणार आहेत, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व महिला बालविकास राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

याप्रसंगी विधानपरिषदेतील मुख्य प्रतोद आमदार विक्रम काळे, जि.प. अध्यक्षा उषाताई पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार सतीश चव्हाण, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, महापौर जयश्री सोनकांबळे, लातूर पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले आणि महाराणा प्रतापनगरच्या सरपंच संगिता पतंगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना आणि मनपा आयुक्त मानसी मीना यांसह विविध विभागांचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या या महत्त्वपूर्ण सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे,यांनी केले आहे.

## लातूरच्या शिक्षण क्षेत्राची प्रतिमा धोक्यात

### शिक्षकी पेशाला काळीमा, लातूरच्या शिक्षकाचा झिंगाट पॅटर्न

**लातूर/प्रतिनिधी :** देशभरात ओळख असलेल्या लातूर पॅटर्नचा एक नवीन झिंगाट पॅटर्न पाहायला मिळाला. सविस्तर मिळालेल्या माहितीनुसार एका नामांकित खाजगी इंग्रजी विद्यालयातील एका शिक्षकाच्या चिमूने परीक्षा पेपर तपासताना दारूच्या नशेत व सिगरेट ओढत काम केल्याचा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला आहे

या व्हिडिओमध्ये संबंधित शिक्षक धाब्यावर आपल्या मित्रांसोबत बिनधास्तपणे दारू व सिगरेट ओढत शाळेतील पेपर तपासण्याचे प्रकार पहावयास मिळाला लातूर हा जिल्हा शिक्षणातील दर्जेदार निकाल आणि अभ्यासाच्या शिस्तबद्ध पद्धतीसाठी ओळखला जातो अशा प्रकारे गैरवर्तन समोर येणे ही अत्यंत गंभीर बाब समजली जात आहे.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी थेट संबंध असलेल्या परीक्षांच्या उत्तर पत्रिका तपासताना अशाप्रकारे निष्काळजीपणा आणि गैर जबाबदारी दाखवली जात असल्याने पालक आणि नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे याबाबत लातूरच्या शिक्षक अधिकारी तृप्ती अंधारे यांनी कठोर कारवाई करणार असल्याचे संकेत दिले आहे या घटनेने शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे शाळेतील प्रशासन झोपा काढत होते का या प्रकरणात शिक्षकच नाही तर शाळेच्या प्रशासनावर कारवाई व्हावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे या शिक्षकांची भरती कोणत्या पात्रतेच्या आधारे करण्यात आली आहे यांच्याकडे शिक्षक पेशाची निगडित पदवी आहेत काय त्यांचे शैक्षणिक पार्श्वभूमी परताळणी करण्यात आली आहे का ? याची कसून चौकशी करण्याची गरज आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



इराण ने डिल स्वीकारल्यास युद्ध होईल: अमेरिकन संरक्षण मंत्री...

## चिमटा दयाचा



शिक्षणाच्या पंढरीत नशा
करून पेपर तपासले जाते
हे मोठे आश्चर्य आहे !
हा प्रकार आता उघडा
पडल्याने आश्चर्य वाटणे
ही स्वाभाविक आहे !!

## आमदार अभिमन्यू पवारांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

### एकच परीक्षा, डिजिलॉकर पडताळणी आणि 'निपुण सेतू' उपक्रमाची घोषणा

**औसा/प्रतिनिधी :** शासकीय नोकरभरती प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेगवान करण्याच्या निर्णयाबद्दल आमदार अभिमन्यू पवार यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आभार मानले. नुकत्याच पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नोकरभरतीसंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयानुसार, शासनाच्या विविध विभागांतील गट-अ आणि गट-ब दर्जाच्या समान सेवाप्रवेश नियम असलेल्या पदांसाठी एकाच परीक्षाप्रक्रियेद्वारे भरती केली जाणार आहे. तसेच अराजपत्रित गट-ब आणि गट-क पदांसाठीही एकच परीक्षा घेण्यात येणार आहे. या बदलासाठी सर्व संबंधित संवर्गांच्या सेवाप्रवेश नियमांत आवश्यक सुधारणा करण्यात येतील.या सुधारणांमुळे उमेदवारांना वर्षभर विविध पदांसाठी वेगवेगळे अर्ज भरणे, वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचा अभ्यास करणे आणि विविध परीक्षांच्या निकालांची प्रतीक्षा करणे यापासून मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच न्यायालयीन प्रकरणांमुळे निर्माण होणारी गुंतागुंतही कमी होण्याची अपेक्षा आहे. उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणी प्रक्रियेत होणारा विलंब टाळण्यासाठी डिजिलॉकरद्वारे पडताळणी करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

याशिवाय, राज्यसेवेच्या मुलाखतीपर्यंत पोहोचूनही निवड न झालेल्या उमेदवारांना सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी निपुण सेतू हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या सर्व सुधारणा राबवल्यानंतर भरती प्रक्रिया अधिक सुलभ होईल आणि शासनाला सक्षम व गुणवत्तापूर्ण अधिकारी-कर्मचारी मिळतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी न्यायालयीन प्रकरणांमुळे विविध भरती प्रक्रियांना होणारा विलंब आणि निवड होऊनही उमेदवारांना नियुक्तीसाठी करावी लागणारी प्रतीक्षा याकडे लक्ष वेधले. अनेकदा संबंधित विभाग वेळेत आपले म्हणणे सादर करत नसल्याने प्रकरणे



लांबणीवर पडतात, त्यामुळे अशा प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी विशेष व्यवस्था निर्माण करण्याची मागणी त्यांनी केली.

यावर मुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, शासकीय नोकरभरतीसंबंधी प्रकरणे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (MAT) कार्यकक्षेतून वगळून थेट उच्च न्यायालयाच्या कार्यकक्षेत आणण्याबाबत विचार सुरू असल्याचे सांगितले. तसेच उच्च न्यायालयात MPSC प्रकरणांसाठी तज्ज्ञ वकिलांचे स्वतंत्र पॅनल नियुक्त करण्याचाही विचार आहे. यामुळे MAT आणि त्यानंतरच्या अपील प्रक्रियेस लागणारा वेळ वाचून प्रकरणांचा जलद निपटारा होण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

या भेटीदरम्यान आमदार गोपीचंद पडळकर, आमदार मंगेश चव्हाण आणि माजी आमदार पृथ्वीराजबाबा देशमुख हे देखील उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## निसर्ग व पाणी प्रश्न

आपल्या देशात निसर्ग साथ देत नाही. विविध राज्यात नैसर्गिक समस्या आहेत. एकसमान नाहीत. एक तर महाराष्ट्रात समसमान पावुस पडत नाही. दुसरे काही राज्यात हवामानाचा म्हणजे वाऱ्यामुळे पावसाची समस्या निर्माण होते. मुळात एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, निसर्ग लहरी का बनला? किंवा निसर्गाने आपले ऋतूचक्र का बदलले? या मागील कारणे कोणती? नुकसान कोरोनामुळे, लॉकडाऊन करण्यात आले होते. त्याकाळात हवेतील दुषीतपना अतिषय कमी झाला होता. ऑक्सीजनची मात्रा अधिक होती. वातावरणात जो दुषीतपना होता तो कमी झाला, कारण गाड्या बंद होत्या, कारखाने बंद होती. वातावरणातील दूषीतपना कमी झाला होता हे मान्यच केले पाहिजे. विकास साधायाचा झाला तर दुषीतबाब यामुळे निर्माण होणारा समस्या सोडविली पाहिजे! कारखानदारी वाढली तर मोठ्या प्रमणात दूषीतवातावरण हवा वाढली, शहराचा विकास झाला तर गाड्याचे प्रमाण वाढते, यातून निघणारा धूर हा आरोग्यास घातक आहे, यावर मात निसर्गच करू शकतो. पुर्वी मोठ्या प्रमाणात झाडी होती, गावात गेल्यावर सावलीच दिसत होती, शेतात गेल्यावर झाडाखाली विश्रांती घेता येत होती. यामुळे भरपूर प्रमाणात ऑक्सीजनची मात्रा मिळत होती. हवेतील गरमी कमी यामुळे जाणवत होती. आता गाडी सावलीत लावण्यासाठी झाड शोधावे लागते. एका झाडाखाली पाच-पन्नास गाड्या लावल्या जातात. अशी स्थिती दिसून येते. मुळात निसर्गाचा ऱ्हास मानवाने केला, यामुळे सर्व समस्या निर्माण झाल्या आहेत. यावर मात करण्याचा कोणी प्रयत्न केला नाही. आज उन्हाळ्यात पावुस पडतो, गारा पडतात हे योग्य नाही. उन्हाळ्यात जमीन तापली पाहिजे. हिवाळ्यात थंडी व पावसाळयात पावुस पडला पाहिजे. जगात असे तिन ऋतू सापडणार नाहीत. यामुळे भारतीयांचे आरोग्य सुदृढ आहे. आता वातावरणाचा परिणाम सर्वबाबी होत आहे. वातावरणात उष्णता वाढली आहे. वातावरणातील उष्णतेचा परिणाम हा सर्व घटकावर होत आहे. पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. जमीनीतील पाणी कमी होत आहे. उन्हाळ्यातच पाणी टंचाई का भासते? यामागील कारणे कोणती? यावर चिंतन केले तर एक बाब लक्षात येते की, उष्णतेचा हा परिणाम आहे. उष्णता कमी करण्यासाठी निसर्गाने उपाय व पर्याय दिला आहे. मानवाने झाडे तोड थांबवुन झाडे अधिक लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. झाडे लावण्यापेक्षा आपल्या देशात वृक्षतोड अधिक आहे. ही वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होते. यावर प्रतिबंध असला तरी सौम्य आहे. कठोर शिक्षेची तरतुद नाही. आज शेकडो लाकुड कापणाऱ्या गिरण्या चालतात हे वनअधिकारी किंवा प्रशाासनास दिसत नाही का? दिसते यात गैरप्रकार होत असतो. त्यामुळे गुपचित चालते. मुळात झाडे तोड केल्यास कठोर दंड, शिक्षा असावयास पाहिजे. ती नाही. म्हणून निसर्गाचा ऱ्हास होत आहे. परिणाम निसर्गावर होत आहे. वातावरणातील उष्णता वाढली आहे. आरोग्य धोक्यात आले आहे. ईश्वराने प्रत्येक बाबीवर उपाय दिलेला आहे. त्या उपयाकडे दुर्लक्ष केले जाते. जसे निसर्गाचा समतोलपना राखण्यासाठी झाडे लावुन ती जगविली पाहिजेत. निसर्गात मोठ्या प्रमाणात दूषीतपना निर्माण झाल्यास यज्ञ केला पाहिजे. यज्ञामुळे दूषीत वातावरण शुद्ध होण्यात मदत होते. आपल्यापुर्वजांनी उपाय सांगितला आहे. त्याबाबीकडे दुर्लक्ष केले जाते. मुळात सर्वात मोठी समस्या ही पिण्याच्या पाण्याची आहे. निसर्ग पाणी पावसाळ्यात पडते. तेच पाणी जमीनीत मुरविले पाहिजे. पाणी वाया जाता कामा नये. पाण्याची साठवण म्हणजे पाणी जमीनीत झिरपने हा एक उद्देश आहे. पाणी वाया घालविले जाते. पाणी जमीनीत मुरण्यापेक्षा वाया घातल्याने पाण्याची पातळी खोलवर जाते. हे साधे गणित समजले पाहिजे. मुळात अनेकांना पाणीटंचाई कशामुळे भासते हे माहिती आहे. पावुस वरचेवर कमी का पडतो आहे. हे माहिती आहे. निसर्गातील बदल होत आहे हे माहिती आहे तरी त्याबाबीकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. निसर्गाचा जेवढा नाश कराल तेवढे संकट अंगलट येणार आहे. मुळात निसर्गाशी नाते जोडा असे म्हटले जाते मात्र नाते जोडण्यापेक्षा तोडण्यात अधिक दिसून येतात. त्यामुळे निसर्गाचा ऱ्हास करू नका. निसर्ग अनेक बाबी मोफत देतो. एक पाण्याची बाटली पंधरा-वीस रूपया मिळते. निसर्ग जून महिण्यात हजारो लिटर्स पाणी मोफत देते. सूर्य, हवा पैसा घेत नाहीत. मोबाईल निसर्गाच्याकृपेने चालतो. हवेवर चालते पैसा कोण वसुल करतात तर कंपन्या! याचा तरी विचार करावा. जे मोफत देतात त्याची किमान निगा राखा. ऱ्हास करू नका. आगामी जीवन व्यवस्थित जगायाचे झाले तर निसर्गाची जोपासना करावी लागणार आहे. जगात वाढत्या उष्णतेच्या प्रमाणावर चिंता व्यक्त केले जाते. उपाय मात्र कोणी करत नाही. मुळात निसर्ग व पाणीप्रश्न एकमेकाशी पुरक बाबी आहेत. पाणी समस्या कायम सोडवायाची झाली तर निसर्गाची जोपासना करावी लागेल. लातूरच्या नागरिकांना पिण्याचे पाणी नळास पिवळे येत आहे. या बाबत संशोधन केल्यास असे कळले की, उन्हामुळे पाण्यात ऑक्सीजनचे प्रमाण कमी होत असल्याने पिण्याचे पाणी पिवळे येत असल्याचे सांगितले जाते. ऑक्सीजन किती महत्त्वाचे आहे हे माहिती असताना झाडे लावली जात नाहीत. निसर्ग व पाणी महत्त्वाचे आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. एखादेवेळी जेवन नसेल तर चालते मात्र पाणी आवश्यक आहे. उन्हाळ्यात तर पाण्याशिवाय काहीही शक्य नाही हे लक्षात घेतले पाहिजे. यापुढे काही वर्ष कटाक्षाने झाडे तोड थांबवावी लागेल. या बाबत कठोर निर्णयाची गरज आहे. आताच काही कठोर निर्णय घेतला तरच ठिक नसता एकदा वेळ निघून गेल्यास पुन्हा उपायोजना करून लाभ होणार नाही

# नारी शक्ती वंदन : लोकशाहीच्या नव्या पर्वाची सुरुवात

भारताच्या लोकशाही प्रवासातील काही क्षण केवळ कायदेशीर बदल नसतात, तर ते एका नव्या युगाची नांदी ठरतात. नवीन संसद भवनात पहिले विधेयक म्हणून सादर झालेला नारी शक्ती वंदन अधिनियम हा असाच एक आश्वासक टप्पा आहे. २८ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीने या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. आजपासून (१६ एप्रिल २०२६) सुरू होणारे संसदेचे तीन दिवसीय विशेष सत्र या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ऐतिहासिक ठरणार आहे. हे केवळ धोरणात्मक पाऊल नसून, निम्म्या लोकसंख्येला धोरणकर्ते म्हणून मुख्य प्रवाहात आणणारे संविधानिक अधिष्ठान आहे. महिला आरक्षणाचा प्रवास जवळपास तीन दशकांचा आहे. १९९६ मध्ये सुरू झालेला हा संघर्ष आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. महिलांच्या हाती कायदेशीर सत्ता देण्याचे महत्त्वपूर्ण काम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पूर्ण करत आहे. हा कायदा केवळ ३३% आरक्षणापुरता मर्यादित नसून, तो सत्तेच्या रचनेत महिलांना प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व देतो.




### विशेष सत्रातील संशोधने आणि पुढील दिशा

या कायद्याच्या पूर्ण अंमलबजावणीसाठी जनगणना आणि मतदारसंघांची पुनर्रचना (परिसीमन) आवश्यक आहे. १६ ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान चालणाऱ्या विशेष सत्रात यावर सखोल चर्चा होऊन महत्त्वाची संशोधने मांडली जातील. यामध्ये २०११ च्या जनगणनेला आधार मानून परिसीमन करण्याची आणि लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढवण्याची शक्यता आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी या आरक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, असा सरकारचा प्रयत्न आहे. या प्रक्रियेनंतर परिसीमन आयोगाची नियुक्ती आणि आरक्षित जागांचे चक्राकार पद्धतीने वाटप होईल.

### प्रतिनिधित्वाचा नवा समतोल

सध्या लोकसभेतील महिला खासदारांचे प्रमाण एकूण संख्येच्या अवघे १४% आहे. नवीन तरतुदींमुळे ही संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल. यामुळे कायदेमंडळातील चर्चेचा दर्जा आणि संवेदनशीलता वृद्धिंगत होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लाखो महिलांच्या अनुभवाच्या विस्तारासाठीचा हा पुढचा टप्पा आहे. आता महिला केवळ सरपंच-पतीच्या सावलीत न राहता, पंचायतीपासून थेट संसदेपर्यंत पोहोचतील. हा बदल त्यांना प्रतीकात्मक सत्तेकडून वास्तविक सत्तेकडे घेऊन जाईल.

### सर्वसमावेशक न्याय आणि नेतृत्व विकास

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांसाठी यात अंतर्गत आरक्षणाची तरतूद आहे. यामुळे समाजातील शेवटच्या स्तरातील महिलेला निर्णय प्रक्रियेत स्थान मिळेल. मतदारसंघांच्या चक्राकार (रोटेशन) पद्धतीमुळे राजकीय मक्तेदारी मोडीत निघेल आणि विविध भौगोलिक क्षेत्रांतून नवीन महिला नेतृत्व पुढे येईल.

### पायाभूत सुविधा आणि आर्थिक सक्षमीकरण

राजकीय आरक्षण हे सुरक्षित वातावरणातच यशस्वी होऊ शकते. जेव्हा एखादी स्त्री पाण्यासाठी होणारी पायपीट आणि चुलीच्या धुरापासून मुक्त होते, तेव्हाच तिच्याकडे समाजकार्यासाठी वेळ उरतो. गेल्या दशकातील उज्ज्वला योजना, स्वच्छ भारत अभियान आणि जल जीवन मिशन यांसारख्या उपक्रमांनी महिलांना तो सन्मान दिला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत ६९% घरांची मालकी महिलांकडे असणे, हे त्यांच्या सामाजिक सक्षमीकरणाचे मोठे उदाहरण आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम स्त्रीच राष्ट्राचा विकासदर वाढवू शकते. मुद्रा योजनेतील ७०% कर्जदार महिला असणे किंवा लखपती दीदी आणि नमो ड्रोन दीदी यांसारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती होत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मते, महिलांचा सहभाग वाढल्यास भारताच्या मध्ये २७% वाढ होऊ शकते. कुशल महिला कार्यबळात सामील झाल्या तर भारताचा विकासदर वार्षिक ९ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकतो.

### विकसित भारताचा पाया

नारी शक्ती वंदन अधिनियम हा २०४७ पर्यंतच्या विकसित भारताचा जाहीरनामा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे, जोपर्यंत देशाच्या विकासात महिलांचा समसमान वाटा झाल्यास खऱ्या अर्थाने विकसित होऊ.

तीन तलाक बंदी, झीरो-एफआयआर आणि जलदगती न्यायालये यांमुळे महिलांना मिळालेले सुरक्षिततेचे कवच त्यांना नेतृत्वासाठी आत्मविश्वास देते. आता ती केवळ गृहिणी राहिलेली नाही, तर ती राष्ट्रनिर्माती आहे. जेव्हा स्त्री स्वतःच्या क्षमतेने सत्तेच्या केंद्रस्थानी येते, तेव्हा संपूर्ण राष्ट्राच्या भविष्याला नवी आणि आश्वासक दिशा मिळते.




– डॉ. श्याम टरके
सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

# लातूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील जुनी एमआयडीसी परिसरात बॉयलरचा अचानक स्फोट

## एमआयडीसी पोलिसांची तात्काळ भेट व तत्पर कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील जुनी एमआयडीसी परिसरात प्लॉट क्रमांक ई-१/२ व १/३/१ येथे असलेल्या मुंदडा ट्रेडर्स या ल्युमिनियम कोटिंग व ल्युमिनियम शीट निर्मिती करणाऱ्या उद्योगामध्ये आज दि. १६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ०४.०० वाजण्याच्या सुमारास कोटिंग प्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या बॉयलरचा अचानक स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली.

घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस स्टेशनकडून तात्काळ पोलीस नियंत्रण कक्ष, लातूर तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात येऊन तात्काळ घटना सहज भेट दिली. त्यानंतर महापालिका अग्निशमन दल व एमआयडीसी अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल करण्यात आल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून सुमारे ०६.०० वाजेपर्यंत आग पूर्णपणे नियंत्रणात आणून विझविण्यात यश मिळविले. सदर घटनेमध्ये मुंदडा ट्रेडर्स या युनिटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे.

बॉयलर स्फोटामुळे त्या ठिकाणी काम करणारे दोन कामगार गंभीर जखमी होऊन त्यापैकी दत्ता बुरांगे, रा. प्रकाश नगर, लातूर हे मयत झाले असून अभी कुमार, मूळ रा. उत्तर प्रदेश हे गंभीर जखमी असून त्यांना तात्काळ उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

या स्फोटामुळे परिसरातील इतर कोणत्याही औद्योगिक युनिटला कोणतेही नुकसान झालेले नाही. घटनेच्या अनुषंगाने महापालिकेचे उपायुक्त श्री. खणसोळे यांच्याशी समन्वय साधून महापालिकेचे फायर ऑफिसर श्री. जाधव यांना घटनास्थळी बोलाविण्यात आले. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर कार्यालयामार्फत फॉरेन्सिक तपासणी पथकासही पाचारण करण्यात आले असून स्फोटाचे नेमके कारण शोधण्यासाठी सखोल तपास सुरू आहे. एमआयडीसी पोलीस स्टेशनकडून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

# रेल्वेकडून मुंबई आणि चेन्नई दरम्यान सोलापूर विभागातील स्थानकांमार्गे १६ उन्हाळी विशेष गाड्या चालवल्या जाणार



**मुंबई/प्रतिनिधी :** प्रवाशांच्या मागणीनुसार, उन्हाळ्याच्या हंगामात प्रवास करणाऱ्या प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन, रेल्वे प्रशासन मुंबई आणि चेन्नई दरम्यान १६ उन्हाळी विशेष गाड्या चालवणार आहे. याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

या उन्हाळी विशेष गाड्या सोलापूर विभागातील ४ स्थानकांवर थांबतील; ती स्थानके म्हणजे: कुर्डुवाडी, सोलापूर, कलबुरगि आणि वाडी.

उडचढ मुंबई-चेन्नई सेंट्रल साप्ताहिक विशेष गाड्या (१६ फेऱ्या)
– गाडी क्रमांक ०१०१५ ही साप्ताहिक विशेष गाडी १९.०४.२०२६ ते ०७.०६.२०२६ या कालावधीत दर रविवारी मध्यरात्री १२.२० मिनिटांनी उडचढ मुंबईहून सुटेल आणि त्याच दिवशी रात्री ११.३० मिनिटांनी चेन्नई सेंट्रलला पोहोचेल. (८ फेऱ्या)
– गाडी क्रमांक ०१०१६ ही साप्ताहिक विशेष गाडी २०.०४.२०२६ ते ०८.०६.२०२६ या कालावधीत दर सोमवारी पहाटे ०४.०० वाजता चेन्नई सेंट्रलहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०४.१५ वाजता उडचढ मुंबईला पोहोचेल. (८ फेऱ्या)

थांबे: दादर, ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, कुर्डुवाडी, सोलापूर, कलबुरगि, वाडी, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, आदोनी, गुंतकल, गुटी, ताडीपत्री, येर्रगुंटला, कडप्पा, राजमपेट, रेणिगुंटा, अरक्कोनम आणि तिरुवल्लूर.

संरचना : १ वातानुकूलित द्वितीय श्रेणी (AC-II Tier), ६ वातानुकूलित तृतीय श्रेणी (AC-III Tier), ९ शयनयान श्रेणी (Sleeper Class), ४ सामान्य द्वितीय श्रेणी (General Second Class) आणि २ द्वितीय श्रेणी-सह-गार्ड ब्रेक व्हॅन.

आरक्षण आणि बुकिंग: या उन्हाळी विशेष गाड्यांसाठी (ज्यांचे भाडे विशेष दराने आकारले जाईल) आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. आरक्षण नसलेल्या डब्यांसाठी (Unreserved coaches) बुकिंग स्थानकांवरील बुकिंग खिडक्यांवर आणि 'RailOne App' द्वारे देखील करता येईल. प्रवाशांना विनंती करण्यात येते की, कोणत्याही गैरसोयीपासून वाचण्यासाठी त्यांनी वैध तिकिटासहच प्रवास करावा. या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या, अथवा RailOne App किंवा NTES App डाउनलोड करा.

# अक्षय तृतीया सण विशेष

भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना विशेष महत्त्व आहे. त्यातही अक्षय तृतीया हा सण अत्यंत पवित्र, शुभ आणि मंगल मानला जातो. ''अक्षय'' म्हणजे कधीही न संपणारे, सतत वाढत राहणारे. या दिवशी केलेले पुण्य, दान, जप-तप आणि शुभकार्य अक्षय फळ देतात, अशी श्रद्धा आहे. महाराष्ट्रातील खानदेश भागात, विशेषत: अहिराणी संस्कृतीत, या सणाला एक वेगळाच रंग आणि भावनिक स्पर्श लाभलेला आहे.

### खानदेशातील अक्षय तृतीया – परंपरा आणि उत्साह

खानदेशातील ग्रामीण भागात अक्षय तृतीया हा केवळ धार्मिक सण नसून, तो सामाजिक आणि कौटुंबिक नात्यांना बळकट करणारा उत्सव आहे. शेतकरी वर्गासाठी हा दिवस शेतीच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जातो. नवीन पिकांच्या तयारीला प्रारंभ, बैलांची पूजा, आणि शेतातील साधनांची स्वच्छता यामुळे या दिवसाला खास महत्त्व प्राप्त होते.

अहिराणी बोलीभाषेत या सणाला ''आखाजी'' असेही संबोधले जाते. गावागावांत महिलांच्या गाण्यांनी, पारंपरिक खेळांनी आणि सणासुदीच्या जेवणांनी वातावरण भारलेले असते. पुरणपोळी, लापशी, खीर यांसारख्या पारंपरिक पदार्थांचा आस्वाद घेतला जातो.

### लेकींचे माहेर – भावना आणि परंपरेचा संगम

अक्षय तृतीया सणाचे सर्वात भावनिक आणि हृदयस्पर्शी वैशिष्ट्य म्हणजे विवाहित लेकींचे माहेरी येणे. खानदेशात या सणानिमित्त मुलींना माहेरी बोलावण्याची प्रथा आहे. या मागे केवळ परंपरा नसून, आई-वडिलांचा लेकीवरचा अपार प्रेमभाव दडलेला असतो.

लग्नानंतर आपल्या संसारात रमलेल्या लेकीला माहेर म्हणजे जिव्हाळ्याचा आधार असतो. अक्षय तृतीया हा तो क्षण असतो, जेव्हा ती पुन्हा आपल्या बालपणाच्या आठवणींमध्ये हरवते. आईच्या हातचे जेवण, वडिलांचा लाड, भावंडांसोबतचा हसरा संवाद – या सगळ्यामुळे माहेर तिच्यासाठी भावनिक उबदार ठिकाण बनते.

### ''ओटी भरणे'' – सन्मानाची परंपरा

या दिवशी लेकींची ''ओटी भरणे'' ही प्रथा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. आई-वडील आपल्या मुलीला साडी, फळे, गोडधोड, आणि इतर भेटवस्तू देऊन तिचा सन्मान करतात. ही केवळ भेटवस्तू नसून, लेकीच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि आनंद अक्षय राहावा, अशी शुभेच्छा असते.

### अहिराणी संस्कृतीतील सणाची झलक

अहिराणी खानदेशात सण म्हणजे लोकजीवनाचा अविभाज्य भाग. पारंपरिक गाणी, ढोल-ताशांचा गजर, महिलांचे समूहगीत, आणि गावकुसातील एकोप्याची भावना यामुळे अक्षय तृतीया सण अधिक रंगतदार बनतो. येथे सण केवळ विधीपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक एकात्मतेचा उत्सव असतो.

### आधुनिक काळातही परंपरेचे जतन

आजच्या धावपळीच्या आणि आधुनिक जीवनशैलीतही खानदेशातील लोकांनी अक्षय तृतीया सणाची परंपरा जपली आहे. शहरात राहणाऱ्या लेकीसुद्धा या दिवशी माहेरी जाण्याचा प्रयत्न करतात. डिजिटल युगात संवाद सोपा झाला असला, तरी माहेरच्या भेटीचा आनंद अजूनही तसाच जिवंत आहे.

अक्षय तृतीया हा सण खानदेशातील लोकांसाठी केवळ धार्मिक विधी नसून, तो नात्यांचा, प्रेमाचा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. लेकी आणि माहेर यांच्यातील नात्याचा हा सण जिव्हाळा अधिक दृढ करतो. बदलत्या काळातही या परंपरा जपल्या जात आहेत, हेच आपल्या संस्कृतीचे खरे सामर्थ्य आहे.

हा सण प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद, समृद्धी आणि नात्यांमध्ये अक्षय प्रेम घेऊन येवो, हीच शुभेच्छा!

– लेखक.डॉ.अनिलकुमार द्वा.पालीवाल,
ज्येष्ठ पत्रकार, नाशिक

०००००००००००००००००००००००

# उच्चशिक्षित तरुणी कुक्कुटपालनातून बनली यशस्वी उद्योजिका; जालन्याच्या अंकिता मोरे यांचा झेंडा; १० महिन्यात २६ लाखांची उलाढाल

नोकरीच्या मागे धावण्यापेक्षा स्वत:चा उद्योग उभा करून इतरांना रोजगार देण्याचे स्वप्न अनेक तरुण पाहतात, मात्र ते प्रत्यक्षात उतरवणारे कमीच असतात. जालना जिल्ह्यातील गोलापांगरी येथील अंकिता मोरे पाटील या उच्चशिक्षित तरुणीने हे स्वप्न केवळ सत्यात उतरवले नाही, तर कुक्कुटपालनाच्या व्यवसायातून यशाचे 'सोनं' करून दाखवलं आहे. बी.एस्सी. ?ग्रीकल्चरनंतर आता एल.एल.बी.चे शिक्षण घेणाऱ्या अंकिता मोरे यांनी काही वर्षापासून कुक्कुटपालनाचा यशस्वी फॉर्म्युला राबवत आज ५ हजार गावरान कोंबड्यांचे साम्राज्य उभे केले आहे. केवळ १० महिन्यात २६ लाखांचे उत्पन्न मिळवून त्यांनी शेतीपूरक व्यवसायातील नवी वाट दाखवून दिली आहे.

**कोविडच्या संकटात शोधली संधी :-**

सन २०२० मध्ये जेव्हा संपूर्ण जग लॉकडाऊनमुळे ठप्प होते, तेव्हा अंकिता यांनी या संकटाचे संधीत रूपांतर करण्याचे ठरवले. घरातूनच काहीतरी वेगळे करण्याची इच्छा आणि घरच्यांच्या भक्कम पाठबळामुळे त्यांनी कुक्कुटपालनात पाऊल ठेवले. जिजामाता कृषी भूषण प्राप्त सौ. छायाताई मोरे यांचा आदर्श समोर ठेवत, अंकिता यांनी ३५ एकर वडिलोपार्जित शेतीला आधुनिक जोडधंद्याची जोड दिली.

**रिकाम्या गोठ्यातून व्यवसायाची भरारी :-**

सुरवातीला त्यांच्याकडे गाईंचा गोठा रिकामा होता. अंकिता यांनी याच गोठ्याचे रूपांतर पोल्ट्री शेडमध्ये केले. पक्षी वाढल्यानंतर त्यांनी द्राक्षाच्या बागेतील अँगलचा वापर करून कमी खर्चात दुसरे शेड उभारले. खर्च कमी आणि नफा जास्त हे सूत्र त्यांनी पहिल्या दिवसापासून अंमलात आणले.

**स्वत:च झाल्या डॉक्टर आणि मॅन्युफॅक्चर :-**

अंकिता यांनी केवळ ५०० पक्ष्यांपासून सुरुवात केली. पहिले लसीकरण १४ व्या दिवशी तर दुसरे लसीकरण २१ व्या दिवशी करावे लागते. कृषी पदवीधर असल्याने त्यांनी लसीकरणासाठी बाहेरील डॉक्टरांवर अवलंबून न राहता स्वत:च ब्रूडिंग आणि लसीकरण केले. बाहेरचे खाद्य महाग पडत असल्याने त्यांनी स्वत:चा फीड फॉर्म्युला तयार केला. मक्याचा भरडा, डीओसी आणि ५० टक्के हिरवा चारा (शेवगा, दुधी भोपळा, लसूण घास) यांचा वापर करून त्यांनी खाद्याचा खर्च निम्म्यावर आणला. मुक्त संचार पध्दतीचा अवलंब करीत कोंबड्यांना शेतात मोकळे सोडले जाते, ज्यामुळे त्या नैसर्गिक कीड-अळ्या खातात आणि सुदृढ राहतात. रात्री या कोंबड्या शेवग्याच्या झाडावरच मुक्कामाला असतात.

**२७ हजार शेतकऱ्यांना मोफत धडा :-**

अंकिता यांनी केवळ स्वत:ची प्रगती केली नाही, तर एकात्मिक मुक्त-श्रेणी पोल्ट्री मॉडेल विकसित केले. गेल्या ३-४ महिन्यांत त्यांनी २७ हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. आयसीएआर, कृषी विज्ञान केंद्र खरपुडी आणि बीएआयएफ सारख्या संस्थांच्या म दतीने त्या महिला शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देत आहेत.


यशाचा आर्थिक ताळेबंद (१० महिने) :-
एकूण गुंतवणूकखर्च
१० लाख रुपये
एकूण उत्पन्न
२६ लाख रुपये
पक्ष्यांची संख्या
५००० गावरान कोंबड्या
अंडी दर (स्थानिक)
१५ ते १९ रुपये
निर्यात दर (अंडी)
५० ते ८० रुपये
पक्षी विक्री दर
७०० रुपये (प्रती किलोनग)

''शेतीला जोडधंदा हवाच, पण तो करताना योग्य नियोजन आणि अभ्यासाची जोड दिली तर तो नक्कीच फायदेशीर ठरतो. मी स्वत: खाद्य बनवल्यामुळे माझा खर्च ५० टक्क्यांनी कमी झाला आणि नफा वाढला. तुमच्याकडे मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वास असेल तर शून्यातूनही विश्व निर्माण करता येते. शेतीपूरक व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा ठरू शकतो, हेच मला सिद्ध करायचे होते.''

–– अंकिता मोरे, युवा उद्योजिका, गोलापांगरी

# 'शक्ती' कोणाला..?

महिलांसाठी राखीव जागा २०२९ नंतर अमलात येतील असे १०६ व्या घटनादुरुस्ती विधेयकात म्हटले आहे. आता २०२९मध्येच ती अमलात यावी असे सरकारला का वाटते? नारी शक्ती पेक्षाही भाजपचे बळ वाढवण्याचा हेतू त्यामागे आहे का? संसदेचे अंदाजपत्रकी अधिवेशन संपल्याने दोन्ही सभागृहे २ एप्रिल रोजी बेमुदत तहकूब करण्यात आली. हे प्रथेप्रमाणे झाले. मग अचानक संसदेचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन का बोलावण्यात आले? संसद आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्याचे विधेयक मांडण्यासाठी किंबहुना 'मंजूर' करून घेण्यासाठी हे अधिवेशन आहे.१३१वे घटनादुरुस्ती विधेयक, मतदार संघांची फेररचना विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा दुरुस्ती विधेयक अशी



तीन विधेयके त्यात सादर होणार आहेत. २०२३ मध्ये महिलांच्या राखीव जागांचे -१०६ वे घटना दुरुस्ती विधेयक संमत झाले. सुमारे तीन वर्षांनी त्यात बदल करावा असे केंद्र सरकारला का वाटले? दोन मोठ्या राज्यांत विधानसभा निवडणुका होत असताना ही विधेयके मांडली जात आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.१०६व्या घटना दुरुस्ती विधेयकात महिलांच्या राखीव जागांची अंमल बजावणी 'भविष्यातील जनगणने'शी जोडली होती. नव्या विधेयकात ती अट काढून टाकली आहे. महिलांना राखीव जागा 'मतदार संघांच्या फेररचने नंतर'ठेवल्या जाणार हे नक्की आहे. राज्यांच्या लोकसंख्येनुसार ही फेररचना होणार असल्यास ती कधी होणार हाही प्रश्न आहे आणि तो वादग्रस्तही आहे.

**विरोधकांची पंचाईत**

ही विधेयके पश्चिम बंगाल व तामिळनाडूमध्ये विधानसभेसाठी मतदान होण्यापूर्वी सादर करण्यामागे एक वाद निर्माण करण्याचा भाजपचा हेतू असावा अशी शंका येते. २०२३चे विधेयक प्रकाशित झाल्या नंतर झालेल्या जनगणनेची माहिती आल्या नंतर त्यानुसार मतदारसंघांची फेररचना झाल्या नंतर त्यातील तरतुदी(राखीव जागा) अमलात येतील अशा आशयाची शब्दरचना त्यात आहे. १९७१ च्या जनगणनेनंतर मतदारसंघांची फेररचना (डी लिमिटेशन) झाली, त्यानंतर ती झालेली नाही. मतदारसंघांच्या फेररचनेसाठी २०११च्या जनगणनेचा आधार घेण्यात येणार असल्याचे विधेयकाच्या मसुद्यावरून दिसते. लोकसभेची सध्याची सदस्य संख्या ५४३ आहे ती ८१५ किंवा ८१६ वर नेण्याचा सरकारचा विचार दिसतो. नव्या इमारतीतील सभागृहाची आसन व्यवस्था ८८८ सदस्यांसाठी आहे. दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन घेण्यासाठी १२७२ सदस्यांनाही ते सभागृह सामावून घेऊ शकते. परंतु प्रत्येक राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्या त्या राज्यांना किती जागा कोणत्या सूत्रानुसार देणार ते स्पष्ट नाही. प्रस्तावित विधेयकात 'प्रत्येक जनगणने नंतर' ही अट काढून टाकली आहे. सरकारने नेमलेला आयोग (डीलिमिटेशन कमिशन) त्यास 'योग्य वाटेल त्या' जनगणनेचा आधार घेईल. मतदार संघांच्या'फेर रचने'साठी 'रिॲडजस्टमेंट ऑफ कॉन्स्टिट्युअन्सी'असा शब्द प्रयोग वापरला आहे. वादाचा मुद्दा येथे आहे. दक्षिणेतील बहुतेक राज्यांनी लोकसंख्या नियंत्रण प्रभावीपणे केल्याने त्यांची लोकसंख्या घटली आहे. त्यामुळे त्यांच्या वाट्याला कमी मतदारसंघ येण्याची भीती आहे. उत्तरेतील हिंदी भाषक पट्ट्यातील राज्यांची लोकसंख्या जास्त आहे त्यांना जास्त मतदार संघ मिळतील. प्रतिनिधित्वात असमानता वाढेल. हिंदी पट्ट्यात भाजपची सत्ता आहे. दक्षिणी राज्ये भाजपला अनुकूल नाहीत. मतदार संघांची नवी फेररचना झाल्यावर आपोआपच भाजपचे राष्ट्रीय प्राबल्य वाढेल. सत्तेच्या या असमतोलाला तेलंगण व तामिळनाडूने विरोध केला आहे. ही विधेयके दोन तृतीयांश बहुमताने संमत होणे आवश्यक आहे. लोकसभेत भाजपची ती स्थिती नाही. निवडणुकीमुळे तृणमूल कॉंग्रेस, द्रमुक यांचे खासदार अनुपस्थित राहातील. मग,'उपस्थित सदस्यांच्या दोन तृतीयांश' बहुमताने विधेयके संमत झाली तर आपण महिलांचे तारणहार असल्याचा विजयी दावा भाजप करेल. नामंजूर झाली तर त्याचा दोष ते विरोधकांवर ढकलतील. या विधेयकांना विरोध करणारे 'नारी शक्ती विरोधी' आहेत असे चित्र भाजप व परिवार रंगवेल. दोन राज्यांत महिलांची मते खेचणे व 'भाजप'ला शक्ती मिळवून देणे हा या विधेयकांचा मुख्य उद्देश आहे हे उघड आहे.

# महागाई उंबरठ्यावर!

पश्चिम आशियातील युद्धामुळे भारतातील महागाई आणखी वाढणार आहे. सरकारने व्यावसायिक वापराच्या 'एलपीजी'च्या सिलिंडरच्या दरात नुकतीच पुन्हा वाढ केली.सरकारी कंपन्यांनी 'सीएनजी'च्या दरांमध्ये वाढ केली नसली तरी खासगी कंपन्यांनी सीएनजी दरामध्ये वाढ केली.पॅकेजिंग व वाहतुकीचा खर्च वाढल्याने ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमती वाढणार यात शंका नाही. अमेरिका -इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा परिणाम आता थेट सामान्य नागरिकांच्या खिशावर दिसू लागला आहे. खनिज तेलाच्या किंमतींमध्ये झालेली वाढ, रुपयाची घसरण आणि पुरवठा साखळीतील अडथळे यामुळे महागाई वाढत असून, त्याचा सर्वप्रथम फटका दैनंदिन वापराच्या वस्तूंना बसणार आहे. ग्राहकोपयोगी वस्तूंचे क्षेत्र( फास्टमूव्हिंग कन्झ्युमर गुड्स -एफएमसीजी) सध्या दुहेरी संकटाचा सामना करत आहे. एकीकडे कच्च्या मालाचा खर्च वाढत आहे, तर दुसरीकडे वाहतूक आणि पॅकेजिंगचा खर्चही झपाट्याने वाढत आहे.

'नुवामा इन्स्टिट्यूशनल इक्विटीज'च्या अहवालानुसार २०२६-२७ च्या पहिल्या तिमाही पासून (एप्रिल ते जून) कंपन्या उत्पादनांच्या किंमती किमान तीन ते चार टक्क्यांनी वाढवू शकतात. या दरवाढीमागील सर्वात मोठा घटक म्हणजे खनिज तेल. साबण, शॅम्पू, डिटर्जंट, बिस्किट यांसारख्या उत्पादनांचे पॅकेजिंग प्लास्टिकमध्ये मोठ्या प्रमाणात केले जाते आणि प्लास्टिकचे मूळ पेट्रोलियममध्ये असल्यामुळे खनिज तेलाच्या किंमती वाढल्या की पॅकेजिंगचा खर्च वाढतो. त्याचबरोबर कारखान्यांमधून बाजारपेठेत माल पोहोचवण्याचा वाहतूक खर्चही वाढला आहे.





जहाजांचे भाडे, कंटेनरचे दर आणि विमा प्रीमियम यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सध्या कंपन्या जुन्या साठ्याच्या आधारे किंमती स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. साधारणपणे कंपन्यांकडे ३० ते ४५ दिवसांचा कच्चा माल आणि तयार मालाचा साठा उपलब्ध असतो. त्यामुळे २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीमध्ये या वाढीचा परिणाम मर्यादित राहण्याची शक्यता आहे; मात्र हा साठा संपताच कंपन्यांसाठी दरवाढ करणे अपरिहार्य ठरणार आहे. या परिस्थितीचा परिणाम केवळ 'एफएमसीजी' क्षेत्रापुरता मर्यादित राहणार नाही. भारत मोठ्या प्रमाणावर खाद्यतेल आयात करतो आणि ते प्रामुख्याने समुद्री मार्गाने येते. आंतरराष्ट्रीय तणावामुळे पुरवठा साखळी खंडित झाली, तर खाद्यतेलाच्या किंमतीतही मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्वयंपाकघराचा खर्चही वाढणार आहे.म्हणजेच येत्या काही महिन्यांमध्ये साबण, तेल, पॅकेज्ड अन्नपदार्थ, पेये अशा जवळपास सर्वच आवश्यक वस्तू महाग होऊ शकतात. याचा सर्वाधिक फटका मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील कुटुंबांना बसणार आहे. त्यांना घरगुती खर्च सांभाळणे अधिक कठीण होईल. एकूणच, हा प्रश्न आता केवळ आंतरराष्ट्रीय राजकारणापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशासाठी गंभीर आर्थिक आव्हान ठरत आहे. परिस्थिती लवकर न सुधारल्यास महागाईचा हा दबाव आणखी तीव्र होऊन देशातील खप, उद्योग आणि सामान्य नागरिकांच्या जीवनशैलीवर एकाच वेळी परिणाम दिसून येईल.'सीएनजी' महागला देशातील खासगी कंपन्यांनी सीएनजीच्या दरात वाढ केल्याने इंधन महागाईही जाणवू लागली आहे. वाहनांसाठी हा गॅस वापरला जातो. अदानी गॅस, टोरेंट गॅस आणि थिंक गॅस या कंपन्यांनी वेगवेगळ्या भागांमध्ये सीएनजीचे दर वाढवले आहेत. सरकारी कंपन्यांनी मात्र दरवाढ टाळल्याचे दिसून येत आहे. देशातील विविध भागांमध्ये कार्यरत असलेल्या खासगी गॅस वितरकांनी एप्रिलच्या सुरुवातीपासून सीएनजीच्या किंमतीत प्रति किलो एक ते चार रुपयांची वाढ केली आहे. ही वाढ देशांतर्गत नैसर्गिक वायूच्या दरवाढीनंतर करण्यात आली असून, त्याला आंतरराष्ट्रीय बाजारातील तेल आणि वायूच्या वाढत्या किंमती कारणीभूत असल्याचे सांगितले जात आहे. 'अदानी गॅस'ने गुजरातमध्ये सीएनजीच्या किंमतीत प्रति किलो दीड रुपयांची वाढ केली आहे. 'टोरेंट गॅस'ने राजस्तानसह इतर बाजारपेठांमध्ये सीएनजी दर प्रति किलो अडीच रुपयांनी वाढवले आहेत. याचबरोबर 'थिंक गॅस'ने सर्वाधिक दरवाढ केली असून उत्तर आणि दक्षिण भारतातील बाजारपेठांमध्ये सीएनजीच्या किंमती प्रति किलो अडीच ते चार रुपयांनी वाढवल्या आहेत. ही वाढ सध्या सर्वाधिक मानली जात आहे.

नवीन नियमांनुसार, कर्मचार्याने नोकरी सोडल्यानंतर किंवा कॉंट्रॅक्ट संपल्यानंतर कंपनीला ४८ तासांच्या आत पूर्ण रक्कम अदा करावी लागणार अहे.'फुल अँड फायनल सेटलमेंट) करावी लागणार आहे. यामध्ये ग्रॅच्युइटी आणि इतर थकबाकीचा समावेश असेल. याआधी ही प्रक्रिया ३० ते ६० दिवस चालायची. हे बदल विशेषतः 'प्रोजेक्ट-बेस्ड' किंवा अल्पकालीन कॉंट्रॅक्टवर काम करणार्या कर्मचार्यांसाठी करण्यात आले आहेत. त्यांना कामाचा योग्य मोबदला मिळावा आणि पाच वर्षांची प्रतीक्षा करावी लागू नये, हा यामागचा उद्देश आहे.

**– महेश देशपांडे**

# शेअर बाजाराचा परतावा शून्य

मागील दोन वर्षांमध्ये भारतीय शेअर बाजाराने अपेक्षाभंग करणारा प्रवास केला आहे. एके काळी वेगाने वाढणारा आणि नवीन उच्चांक गाठणारा सेन्सेक्स आता दोन वर्षांच्या नीचांकी पातळीच्या आसपास फिरताना दिसतो, तर 'निफ्टी'नेही या कालावधीत जवळजवळ स्थिर परतावा दिला आहे. गुंतवणूकदारांच्या मनात निर्माण झालेली 'एक लाख' या आकड्याची आशा हळूहळू मावळताना दिसते आणि त्याऐवजी सावधगिरीची भावना अधिक ठळकपणे समोर येते. ही परिस्थिती केवळ बाजारातील तात्पुरता चढउतार नसून एका व्यापक आर्थिक आणि जागतिक बदलांचे प्रतिबिंब आहे. शेअर बाजाराच्या ताज्या घसरणीमागे अनेक परस्पर संबंधित कारणे कार्यरत आहेत.



जागतिक पातळीवर इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढता संघर्ष आणि त्यातून निर्माण झालेला पश्चिम आशियातील तणाव हा एक महत्त्वाचा घटक ठरला आहे. या संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये अचानक वाढ झाली आणि भारतासारख्या आयातनिर्भर देशासाठी ही मोठी चिंता बनली. तेलाच्या वाढत्या किमतीमुळे महागाईचा दबाव वाढतो. उद्योगांच्या उत्पादनखर्चात वाढ होते. परिणामी, कंपन्यांच्या नफ्यावर परिणाम होतो. या साखळी परिणामामुळे शेअर बाजारावर नकारात्मक परिणाम होणे अपरिहार्य ठरते. यासोबतच परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांचा ओघ कमी होणे हा आणखी एक निर्णायक घटक आहे. जागतिक अनिश्चितता आणि उच्च व्याजदरांच्या पार्श्वभूमीवर परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून मोठ्या प्रमाणावर भांडवल काढून घेतले. परिणामी, बाजारातील तरलता कमी झाली आणि तेजी टिकवणे कठीण झाले. गुंतवणूकदारांचा विश्वास डळमळीत झाल्यामुळे मधूनमधून येणारी तेजीही दीर्घकाळ टिकू शकली नाही. व्याजदरांच्या बाबतीतही परिस्थिती गुंतागुंतीची राहिली. 'फेडरल रिझर्व'कडून अपेक्षित दरकपात झाली नाही किंवा ती अनिश्चित राहिली. त्यामुळे जागतिक स्तरावर भांडवलाचा प्रवाह कमी झाला. याचा थेट परिणाम उदयोन्मुख बाजारांवर, विशेषतः भारतासारख्या देशांवर झाला. मजबूत डॉलर आणि कमकुवत होत जाणारा रुपया यामुळे गुंतवणुकीचा खर्च वाढला आणि परदेशी गुंतवणूक आणखी घटली. या सर्व घटकांचा परिणाम बाजारातील विविध क्षेत्रांवर वेगवेगळ्या प्रमाणात दिसून आला. आगामी काळाकडे पाहता, परिस्थिती अजूनही पूर्णपणे अनुकूल झालेली नाही. 'ब्रिकवर्क रेटिंग'सारख्या संस्थांच्या अंदाजानुसार, वित्त वर्ष २०२७ हे सर्वांसाठी तेजीचे वर्ष ठरण्याची शक्यता कमी आहे. त्याऐवजी निवडक क्षेत्रांमध्येच संधी निर्माण होतील. भू-राजकीय तणाव आणि पायाभूत सुविधांवरील वाढती मागणी यामुळे कमॉडिटी क्षेत्राला काही प्रमाणात फायदा होऊ शकतो; परंतु इक्विटी बाजाराला अजूनही जागतिक अनिश्चितता आणि कमाईवरील दबावाचा सामना करावा लागेल.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



वैवाहिक जीवनासाठी योग्य नाही आहे या गोष्टी – खास करून महिला, आपल्या पार्टनरसोबत सहवासाबद्दल बोलताना टाळण्याचा प्रयत्न करतात. कारण त्या यात स्वत:ला असहज जाणवतात किंवा त्यांना असे वाटत की सहवासाबद्दल बोलण्याची काहीच गरज नसते. पण हिच सर्वात मोठी चूक आहे जी तुमची सेक्स लाईफ बरबाद करू शकते. तर पाहूया त्या ७ गोष्टींकडे ज्या तुमच्या सहवास लाईफसाठी योग्य नाही आहे.

## २ Joke विनोद






शिक्षक : सांग बंडू, चहा लाभदायक की नुकसानकारक?

बंडू : कुणी पाजला तर लाभदायक, पाजावा लागला तर नुकसानकारक.

## ३ Message संदेश





**Banta:** Name the 3 fastest means of communication.

**Santa:** Telephone, Television, Tell-a-woman

## ४ Thought सुविचार




त्याग करावा पण ताठा नसावा.

**संस्कृत सुभाषित**

**युक्तियुक्तं प्रगृह्णीयत बालादपि विचक्षणः।**
**खेरविषयं वस्तु किं न दीपः प्रकाशयेत्?।।**

अर्थ : एखादी योग्य गोष्ट लहान मुलाने जरी सुचविली ती तिपुणानेही ग्राह्य धरावी. जिथे सूर्यप्रकाश पोचत नाही, (ती जागा) दिव्याने प्रकाशित होत नाही का?

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. कलागत लावणारा
३. हवाई प्रवाशांचा थांबा
५. पशु, श्वपद
८. सुप्रसिद्ध
९. आवश्यक गणसंख्या
१०. झाकण्याचे पात्र
११. सद्वर्तनी
१३. हेतुपुरस्पर वेळ वाया घालविणे
१५. कडकडीत, गरम
१६. रसाळ, गोमटी फळे देणारा मसंयमफ
१७. युद्ध
१९. भूपती
२०. अंदमानलगतचे बेट
२२. अनुयायी, सेवक
२३. कर्ण
२५. एकमेकापुढे
२७. पाप
२९. चकाकी
३१. अती उंचीचे विशेषण
३२. शंकर
३३. कांद्याचे हिरवे पान
३४. शेंगेची साल
३६. चुलता
३७. आजूबाजूला, निकट
३९. एक सुगंधी उष्ण पेय
४०. कायदेशीर
४१. पसरट, उथळ वाटी
४२. चांगली
४३. अंकुर
४४. सवड
४७. कैद
४८. चाळा, छंद
४९. उणीव, बनावटपणा
५०. व्यसनी
५१. ठसा उमटविणे, एकसारख्या प्रती काढणे
५२. युक्ती
५३. पवित्र
५४. विरड्यांची डाळ
५५. अदृश्य
५६. खून, हत्या
५८. दंड व बाहू यांना जोडणारा सांधा
६०. सतत
६२. दुसऱ्याचे उपकार
६४. मनुष्य
६५. आईचा भाऊ
६७. पांढरे सुगंधी फूल
६८. कौसल्यापुत्र
६९. दृष्टीभेट
७०. अहंकार
७१. ताणल्यास तुटणारे

### उभे शब्द

१. छोटी घागर
२. अभ्यासपूर्ण भाषण
३. उगीच, नाहक
४. प्रकरण, घटना, बाब
५. सोन्याचांदीचा धागा
६. बारसे
७. किरकिर करणारा
१२. भूमीतील तीन कोनांची नावे
१४. दुसऱ्यासाठी केलेला खर्च
१८. सुसर
२०. निर्णय
२१. मदत न करणे
२४. स्वैर, नियमबाह्य
२५. संतोष
२६ मयूर
२७. सरसरीत
२८. अंदाज, अनुमान
३०. पोपट
३३. एक चर्तुथांश
३५. भेग, चीर
३६. तांबडा भोपळा
३७. लोकांचा घोळका
३८. पाण्याला करून दिलेली वाट
३९. न वापरलेला, नवा
४०. टपोरी, मवाली
४३. सांगड (ला.)
४४. गुन्हा
४५. सदोदित
४६. खर्चातील कपात
४७. महासर्प
४८. वाळवलेल हरभरा
४९. सुगरणीचे घरटे, केशरचनेचा पेशवेकालीन प्रकार
५०. नूतन
५२. नगण्य किंमत
५७. परका
५९. वारा
६१. संमती, होकार
६२. रज:कण
६३. इच्छा
६४. फक्त, केवळ
६५. भडीमार
६६. प्रतिष्ठा, अब्रू

### आडवे उत्तर

१.कळलाव्या ३.विमानतळ ५.जनावर ८.ख्यातनाम ९.कोरम १०.डबा ११.शीलवान १३.कालपव्यय १५.कढत १६.धीर १७.समर १९.राजा २०.निकोबार २२.गण २३.कान २५.समोरासमोर २७.पातक २९.लकाकी ३१.ताडमाड ३२.हर ३३.पात ३४.टरफल ३६.काका ३७.जवळपास ३९.कोको ४०.सनदशीर ४१.रानटी ४३.मोड ४४.अवसर ४७.अटक ४८.चळ ४९.खोट ५०.नशाबाज ५१.छापणे ५२.करामत ५३.पाक ५४.वाल ५५.गडप ५६.वध ५८.कोपर ६०.हरघडी ६२.परोपकार ६४.मानव ६५.मामा ६७.मोगरा ६८.राम ६९.नजरानजर ७०.गर्व ७१.नाते

### उभे उत्तर

१.कळशी २.व्याख्यान ३.विनाकारण ४.मामला ५.जर ६.नामकरण ७.रडतराऊत १२.लघुकोन काटकोन विशालकोन १४.पदरमोड १८.मगर २०.निकाल २१.असहकार २४.बेताल २५.समाधान २६.मोर २७.पातळसर २८.कयास ३०.कीर ३३.पाव ३५.फट ३६.काशी यात्रा ३७.जमाव ३८.पाट ३९.कोरा ४०.सडकछाप ४३.मोट ४४.अपराध ४५.सतत ४६.काटकसर ४७.अजगर ४८.चणे ४९.खोपा ५०.नवा ५२.कवडीमोल ५७.उपरा ५९.पवन ६१.रकार ६२.पराग ६३.कामना ६४.मत्र ६५.मारा ६६.मान



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीला ब्रेनस्ट्रोकचा धोका

**मुंबई** –आपल्या निर्भीड शैली, आकर्षक रूप आणि क्रिकेटच्या मैदानातील स्फोटक फलंदाजीसाठी ओळ–खला जाणारा विनोद कांबळी सध्या खऱ्या आयुष्यात एका अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहेत. एकेकाळी आपल्या प्रतिभेने लाखो लोकांचे मन जिंकणाऱ्या कांबळींची सध्याची अवस्था कोणालाही कळवळायला लावणारी आहे. पण, दिलासादायक बाब ही आहे की या कठीण काळात तो एकटा नाही, त्यांचे जवळचे मित्र त्यांच्या प्रकृती सुधारण्याची आशा बाळगून आहेत.कांबळीचा जवळचा मित्र, मार्कस कुटो म्हणाला, मफ्सुमारे एक वर्षापूर्वी कांबळीच्या मेंदूत रक्ताची गाठ आढळली होती, ज्यावर उपचार करण्यात आले. डॉक्टरांच्या मते, ही गाठ पूर्णपणे काढता येत नाही, त्यामुळे भविष्यात त्याला पक्षाघाताचा धोका आहे. सध्या तो चालू शकतो, पण त्याची स्मरणशक्ती पूर्वीसारखी तल्लख नाही आणि तो अनेक गोष्टी विसरतो.कांबळीने दारू पूर्णपणे सोडली आहे, हे एक सकारात्मक चिन्ह आहे. पण, धूम्रपान त्याच्या आरोग्यासाठी एक मोठा धोका आहे. डॉक्टर आणि मित्रांच्या मते, जर त्याने हे सोडले नाही, तर त्याला भविष्यात गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते. मी कांबळीच्या मित्रांचा एक थहरीआर्ि्रीी बिनवला आहे.

### मडोसा-इडली-सांबर-चटणीफ गाण्यावरून संतापली चेन्नई; केली बीसीसीआयकडे तक्रार

मुंबई–आयपीएल २०२६ मधील रॉयल चॅलेंजर्स बंगळूर आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यातील सामना मैदाना–पुरताच मर्यादित राहिला नाही, तर आता तो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. ५ एप्रिल रोजी बंगळूरच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या साम न्यादरम्यान वाजवण्यात आलेल्या एका गाण्यावरून सीएसकेने थेट बीसीसीआयकडे तक्रार केली आहे. सीएसकेच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या डावापूर्वी मफ्डोसा, इडली, सांबार, चटणीफ्फ हे गाणे वाजवून संघाची खिल्ली उडवण्यात आली. यामुळे खेळाडूंचा अपमान झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

डीजेच्या वर्तनावरही आक्षेप :

वृत्तानुसार, आयपीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सीएसकेची तक्रार प्राप्त झाल्याची पुष्टी केली असून, या प्रकरणाची चौकशी केली जाणार आहे. सीएसकेचे व्यवस्थापकीय संचालक काशी विश्वनाथन यांनीही नाराजी व्यक्त करत सांगितले की, स्टेडियममधील डीजेचे काम प्रेक्षकांचे मनोरंजन करणे असते, परंतु खेळाडूंवर टिप्पणी करणे किंवा त्यांची चेष्टा करणे हे खेळाच्या भावनेविरुद्ध आहे.

मडोसा–इडलीफ गाण्यावरून आधीही वाद :

हे गाणे याआधीही चर्चेत राहिले आहे. संगीतकार गणा अप्पू यांच्याशी संबंधित असलेले हे गाणे ीएँ–एएख सामन्यांदरम्यान वारंवार वादाचे कारण ठरले आहे.

### भारतीय महिला; तब्बल १० वर्षांनी गैर-चिनी खेळाडूचा बोलबाला

मुंबई–भारतीय ग्रँडमास्टर वैशाली रमेशबाबू यांनी फिडे महिला कॅन्डिडेट्स टूर्नामेंट २०२६ जिंकली आहे. १५ एप्रिल रोजी सायप्रसमधील कॅप सेंट जॉर्ज हॉटेलमध्ये झालेल्या अंतिम फेरीनंतर त्या गुणतालिकेत अव्वल स्थानी होत्या. पांढऱ्या सोंगट्यांनी खेळताना, वैशालीने अंतिम फेरीत अनुभवी रशियन खेळाडू कॅटेरिना लॅग्नोचा पराभव केला. २४ वर्षीय वैशाली कॅन्डिडेट्स टूर्नामेंट जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली आहे. आता ती जागतिक चॅम्पियनशिपमध्ये चीनच्या विद्यमान विश्वविजेत्या जू वेनजुनला आव्हान देईल. सुरुवातीपासूनच मजबूत पकड रशियाच्या कॅटेरिना लॅग्नोने सिसिलियन डिफेन्सच्या ड्रॅगन व्हेरिएशनचा वापर करून सामन्याची सुरुवात केली. याचा अर्थ असा की, तिने आपल्या राजाचे संरक्षण केले आणि आपल्या काळ्या सोंगट्या अशा प्रकारे ठेवल्या की तिच्या बिशपला कोपऱ्यातून लांबून हल्ला करता येईल. प्रत्युत्तर म्हणून, वैशाली रमेशबाबूने युग–ोस्लाव्ह अटॅक खेळला. याचा अर्थ असा की, तिने अगदी सुरुवातीपासूनच आपल्या पांढऱ्या सोंगट्यांनी राजाच्या बाजूवर आक्रमकपणे हल्ला करण्याची रणनीती अवलंबली आणि खेळावर नियंत्रण मिळवले. १६व्या चालीपर्यंत वैशालीकडे स्पष्ट आघाडी होती. त्यानंतर, तिने घाई न करता रशियन खेळाडूच्या चुकांचा पुरेपूर फायदा घेतला.

## पंजाब किंग्सने मोडला सीएसके-आरसीबीचा मोठा रेकॉर्ड

# आयपीएल इतिहासात मुंबईविरुद्ध अशी कामगिरी करणारा पहिलाच संघ

झइघड ाशिलेंीव: आयपीएल २०२६ मध्ये पंजाब किंग्सने मुंबई इंडियन्सला ७ गडी राखून पराभूत केलं. या विजयामुळे पंजाब संघाने चेन्नई सुपर किंग्स व आरसीबीचा विक्रम मोडला आहे.

पंजाब किंग्स आयपीएल इतिहासात मुंबई इंडियन्सविरूद्ध अशी कामगिरी करणारा पहिला संघ (फोटो–खझड)

किंग्सने (झइघड) आयपीएल २०२६ मध्ये चॅम्पियन मुंबई इंडियन्सचा वानखेडे स्टेडियमवर ७ विकेट्सने पराभव केला. या विजयामुळे पंजाब किंग्सचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला असून ते स्पर्धेत अद्याप अपराजित असलेला एकमेव संघ ठरले आहेत. दुसरीकडे, मुंबई इंडियन्सचा खराब फॉर्म कायम राहिला आणि त्यांना सलग चौथ्या पराभवाचा सामना करावा लागला. या मोठ्या विजयासह झइघड ने एक खास विक्रमही आपल्या नावावर केला. त्यांनी इतिहासात पहिल्यांदाच मुंबई इंडियन्सविरुद्ध एक मोठी कामगिरी केली आहे.

पंजाब किंग्सने आयपीएलच्या इतिहासात वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्ध आपला सहावा विजय नोंदवला आहे. पाच वेळा विजेते ठरलेल्या मुंबई इंडियन्सला त्यांच्या घरच्या मैदानावर इतक्या वेळा पराभूत करणारा पंजाब किंग्स हा पहिलाच संघ ठरला आहे. त्यांनी याआधीचा चेन्नई सुपर किंग्स (उडघ) आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू



(ठउइ) यांचा संयुक्त विक्रम मोडला. आयपीएलमध्ये वानखेडे स्टेडियमम ध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम आता पंजाब किंग्सच्या नावावर आहे. पंजाबने या स्टेडियमवर खेळलेल्या ११ आयपीएल सामन्यांपैकी सहा वेळा मुंबई इंडियन्सला पराभूत केलं आहे. चेन्नई सुपर किंग्सने या मैदानावर खेळलेल्या १३ आयपीएल सामन्यांपैकी पाच वेळा मुंबई इंडियन्सला पराभूत केलं आहे. आरसीबीनेही या मैदानावर पाच वेळा मुंबईला पराभूत करण्याची ही कामगिरी केली आहे. दरम्यान, राजस्थान रॉयल्सने या मैदानावर खेळलेल्या नऊ सामन्यांपैकी चार वेळा मुंबईला पराभूत केलं आहे.

पंजाब किंग्सने मोडला उडघ–ठउइचा मोठा रेकॉर्ड, खझङ इतिहासात मुंबईविरूद्ध अशी कामगिरी करणारा पहिलाच संघ

झइघड ाशिलेंीव: आयपीएल २०२६ मध्ये पंजाब किंग्सने मुंबई इंडियन्सला ७ गडी राखून पराभूत केलं. या विजयामुळे पंजाब संघाने चेन्नई सुपर किंग्स व आरसीबीचा विक्रम मोडला आहे.

पंजाब किंग्स आयपीएल इतिहासात मुंबई इंडियन्सविरूद्ध अशी कामगिरी करणारा पहिला संघ (फोटो–खझङ)

झींपक्षरल घळपसी ठशलेंीव असरळपींी चींीलरळ खपवळरपी: पंजाब किंग्सने (झइघड) आयपीएल २०२६ मध्ये चॅम्पियन मुंबई इंडियन्सचा वानखेडे स्टेडियमवर ७ विकेट्सने पराभव केला. या विजयामुळे पंजाब किंग्सचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला असून ते स्पर्धेत अद्याप अपराजित असलेला एकमेव संघ ठरले आहेत. दुसरीकडे, मुंबई इंडियन्सचा खराब फॉर्म कायम राहिला आणि त्यांना सलग चौथ्या पराभवाचा सामना करावा लागला. या मोठ्या विजयासह झइघड ने एक खास विक्रमही आपल्या नाव–ावर केला. त्यांनी इतिहासात पहिल्यांदाच मुंबई इंडियन्सविरुद्ध एक मोठी कामगिरी केली आहे.पंजाब किंग्सने आयपीएलच्या इतिहासात वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्ध आपला सहावा विजय नोंदवला आहे. पाच वेळा विजेते ठरलेल्या मुंबई इंडियन्सला त्यांच्या घरच्या मैदानावर इतक्या वेळा पराभूत करणारा पंजाब किंग्स हा पहिलाच संघ ठरला आहे. त्यांनी याआधीचा चेन्नई सुपर किंग्स (उडघ) आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (ठउइ) यांचा संयुक्त विक्रम मोडला.आयपीएलमध्ये वानखेडे स्टेडियममध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम आता पंजाब किंग्सच्या नावावर आहे. पंजाबने या स्टेडियमवर खेळलेल्या ११ आयपीएल सामन्यांपैकी सहा वेळा मुंबई इंडियन्सला पराभूत केलं आहे. चेन्नई सुपर किंग्सने या मैदानावर खेळलेल्या १३ आयपीएल सामन्यांपैकी पाच वेळा मुंबई इंडियन्सला पराभूत केलं आहे. आरसीबीनेही या मैदानावर पाच वेळा मुंबईला पराभूत करण्याची ही कामगिरी केली आहे. दरम्यान, राजस्थान रॉयल्सने या मैदानावर खेळलेल्या नऊ सामन्यांपैकी चार वेळा मुंबईला पराभूत केलं आहे.

## वानखेडे मैदानावर वादळ, पाच वर्षानंतर मुंबईसाठी रोहित शर्माच्या जागी आला आणि थेट शतक ठोकले

मुंबई–मुंबईच्या वानखेडे स्टेडियमम ध्ये आज रोहित शर्माच्या जागी दाखल झालेल्या क्विंटन डिकॉकनं पंजाब किंग्जच्या गोलंदाजांची धुलाई करत नाबाद शतक झळकवलं आहे. क्विंटन डीकॉकनं ६० बॉलमध्ये ११२ धावा केल्या. क्विंटन डीकॉकनं या डावात ७ चौकार आणि ८ षटकार मारले आहेत. क्विंटन डीकॉकची वादळी फलंदाजी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर पाहायला मिळाली. त्यानं पंजाब किंग्जच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली. रोहित शर्माच्या जागी फलंदाजीसाठी आल्यानंतर त्यानं टीम मॅनेजमेंटच्या अपेक्षा पूर्ण केल्या.

मुंबई इंडियन्सला अर्शदीप सिंगनं दोन धक्के दिले होते. मात्र, त्यानंतर क्विंटन डीकॉकनं ५३ बॉलमध्ये शतक पूर्ण केलं. क्विंटन डीकॉकला नमन धीरनं अर्धशतक करत साथ दिली. क्विंटन डीकॉकने आयपीएलमधील तिसरं शतक केलं. डीकॉकचा स्ट्राईक रेट १९० पेक्षा अधिक होता. आयपीएलमध्ये डीकॉकनं दिल्ली डेअरडेविल्स म्हणजेच सध्याच्या दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना २०१६ मध्ये पहिले शतक केले होते. त्यानंतर लखनौ सुपर जायंटसकडून खेळताना २०२२ मध्ये शतक डीकॉकने केले होते. आता मुंबई इंडियन्सकडून खेळताना क्विंटन डीकॉकनं तिसरं शतक केले. केएल राहुल आणि संजू सॅमसन या दोघांनी देखील तीनवेळा शतक केलं आहे. तिघांनी देखील एका दिल्लीच्या टीम साठी शतक केले आहे.

क्विंटन डी कॉक हा मुंबई इंडियन्सकडून पंजाब किंग्ज विरोधात शतक करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. क्विंटन डीकॉक अगोदर लेंडल सिमेन्सनं म ोहालीत २०१४ मध्ये ६१ बॉलमध्ये शतक केलं होतं. क्विंटन डीकॉकनं टी २० क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत सातव्या यादीत आहे. पहिल्या सहा फलंदाजांनी टी २० क्रिकेटमध्ये ९ किंवा त्यापेक्षा अधिक शतकं केली आहेत. ख्रिस गेलनं २२, बाबर आझम यानं ११, डेविड वॉर्नर यानं १०, विराट कोहलीनं ९, राईली रोसो यानं ९, साहिबझादा फरहान यानं ९ आणि क्विटन डीकॉकनं ९ शतकं केली आहेत.

## इराण फिफा वर्ल्डकप खेळणार!

नवी दिल्ली–फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा थरार अमेरिकेत रंगणार आहे. इराणचा संघ या स्पर्धे साठी पात्र ठरणाऱ्या संघांपैकी एक होता. मुख्य बाब म्हणजे, केवळ संघांच्या सहभागाच्या बाबतीतच नव्हे, तर व्यावसायिकदृष्ट्याही ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्पर्धा ठरू शकते. या स्पर्धेतून ११ अब्ज डॉलर्सहून अधिक महसूल मिळण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान अमेरिक–इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणचा संघ फिफा वर्ल्डकप स्पर्धा खेळणार की नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात होता.

## मुंबई इंडियन्सच्या प्लेईंग ११ मध्ये होणार बदल

मुंबई–मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर १६ एप्रिल रोजी आयपीएल २०२६ चा २४ वा सामना हा मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्स यांच्यात होणार आहे. हा सामना मुंबई इंडियन्सचा आणि पंजाब किंग्स या दोघांचा प्रत्येकी सध्याच्या सीजनमधील पाचवा सामना असेल. आतापर्यंत मुंबईने केकेआर विरुद्ध झालेला सीजनमधील पहिला सामना जिंकला, मात्र त्यानंतर त्यांना एकही सामना जिंकण्यात यश आलेले नाही. तर पंजाब किंग्सने ४ पैकी ३ सामने जिंकले असून १ सामना हा पावसामुळे रद्द झाला होता. मुंबई इंडियन्सला आयपीएल २०२६ मध्ये दुखापतीचं ग्रहण सुद्धा लागलेलं आहे. अथर्व अंकोलेकर हा दुखापतीमुळे संपूर्ण आयपीएल सीजनमधून बाहेर पडला तर त्याऐवजी क्रिश भगत याची निवड मुंबई इंडियन्समध्ये करण्यात आली. तर आरसीबी विरुद्ध सामन्यात रोहित शर्माला सुद्धा दुखा–पत झाली होती, त्यामुळे गुरुवारी पंजाब किंग्स विरुद्ध होणाऱ्या सामन्यात तो प्लेईंग ११ चा भाग असणार नाही अशी माहिती काही मीडिया रिपोर्ट्समधून समोर येतेय. तेव्हा रोहित ऐवजी मुंबईच्या प्लेईंग ११ मध्ये एका स्टार विकेटकिपर फलंदाजाला संधी दिली जाऊ शकते.

रोहित शर्माला नेमकं काय झालेय?

१२ एप्रिल रोजी वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना झाला होता. या सामन्यात रोहित शर्मा फलंदाजीसाठी मैदानात आला खरा पण काही ओव्हर्स खेळल्यावर तो रिटायर्ड हर्ट होऊन मैदानाबाहेर परतला. त्यानंतर पुन्हा मैदानात परतला नाही. रोहित शर्माला हॅमस्ट्रिंगची दुखा–पत झाली असल्याचे नंतर मुंबईच्या खेळाडूंनी सांगितले. बुधवारी एनडीटिव्हीच्या रिपोर्टनुसार रोहित शर्मा मुंबई इंडियन्सचे पुढील दोन सामने खेळणार नाही. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे त्याला पंजाब आणि पुढील २० एप्रिल रोजी गुजरात टायटन्स विरुद्ध सामना मुकावा लागू शकतो. तेव्हा पंजाब किंग्स विरुद्ध रोहित शर्मा ऐवजी प्लेईंग ११ मध्ये क्विंटन डिकॉकला सलामी फलंदाज म्हणून संधी मिळू शकते.

मुंबई इंडियन्सची संभाव्य प्लेईंग ११ :

रियान रिकल्टन, क्विंटन डिकॉक (विकेटकीपर), सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या (कर्णधार), शरफेन रदरफोर्ड, नमन धीर, मिचेल सँटनर, शार्दुल ठाकुर, दीपक चाहर आणि जसप्रीत बुमराह

इम्पॅक्ट प्लेअर : अश्विनी कुमार

पंजाब किंग्सची संभाव्य प्लेईंग ११ :

प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंह (विकेटकीपर), कूपर कोनोली, श्रेयस अय्यर (कर्णधार), नेहाल वढेरा, मार्कस स्टोइनिस, शशांक सिंह, मार्को यानसेन, जेवियर बार्टलेट, विजयकुमार विशक आणि अर्शदीप सिंह

इम्पॅक्ट प्लेअर : युजवेंद्र चहल

## पॅट कमिन्स आयपीएलमध्ये पुनर–ागमनासाठी सज्ज; गोलंदाजीसाठी पूर्णपणे तंदुरुस्त



मुंबई–सिडनीमध्ये नुकत्याच झालेल्या स्कॅननंतर ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज पॅट कमिन्सला कोणत्याही निर्बंधांशिवाय गोलंदाजी करण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे त्याच्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये पु–नरागमनाचा मार्ग मोकळा झाला आहे.स्कॅनमध्ये याची पुष्टी झाली आहे की, गेल्या वर्षी ऑगस्टपासून त्याला केवळ एकच व्यावसायिक सामना खेळण्यास भाग पाडणारी त्याची पाठीची दुखापत आता पूर्णपणे बरी झाली आहे. हा ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज आता शुक्रवारी भारतात परत येईल आणि आयपीएलच्या उर्वरित सामन्यांसाठी सनरायझर्स हैदराबाद संघात सामील होईल, जिथे तो त्याचा ऑस्ट्रेलियन सहकारी ट्रॅव्हिस हेडसोबत खेळेल. सनरायझर्स या आठवड्याच्या शेवटी चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध आणि पुढील बुधवारी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध घरच्या मैदाना–वर सामने खेळणार असले तरी, कमिन्सला आपल्या पुनरागमनाची घाई करायची नाही. २५ एप्रिल रोजी जयपूरमध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यासाठी अंतिम ११ क्रिकेटपटूंमध्ये परतण्याचे त्याचे लक्ष्य आहे. कमिन्सच्या संघात परतण्यामुळे कर्णधारपद पुन्हा त्याच्याकडे येण्याची शक्यता आहे. त्याच्या अनुपस्थितीत इशान किशनने संघाचे नेतृत्व केले होते. संघ सध्या दोन विजयांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे.कमिन्सचे पुनरागमन हे स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आणि संभाव्य प्लेऑफम ध्ये सहभागी होण्याच्या त्याच्या योजनेनुसारच आहे. यानंतर ऑस्ट्रेलियाचे कसोटी क्रिकेटचे वेळापत्रक व्यस्त असणार असून, पुढील १२ महिन्यांत अंदाजे २१ कसोटी सामने अपेक्षित आहेत.

## भावा तू विश्रांती घे: माजी खेळाडूची हार्दिकवर जोरदार टीका! म्हणाला, कर्णधारपद रोहितकडे



: मुंबई इंडियन्सचा संघ या हंगामात हवी तशी कामगिरी करू शकलेला नाही. दरम्यान माजी क्रिकेटपटू मनोज तिवारीने हार्दिकच्या नेतृत्वावर जोरदार टीका केली आहे.

: मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. वानखेडे स्टेडियम हा मुंबईचा गड आहे. त्याम ुळे या मैदानावर येऊन मुंबईला हरवणं मुळीच सोपं नव्हतं. पण यावेळी उलट चित्र पाहायला मिळत आहे. मुंबईला वानखेडे स्टेडियमवर खेळताना लागोपाठ पराभवाचा सामना करावा लागला आहे. गुरुवारी झालेल्या साम न्यात मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना पंजाबसमोर विजयासाठी १९६ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. हे आव्हान पंजाबने १७ व्या षटकात पूर्ण करून एकतर्फी विजयाची नोंद केली. या दारूण पराभवानंतर हार्दिक पंड्याच्या नेतृत्वावरही जोरदार टीका केली जात आहे.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना मुंबई इंडियन्सने ५ वेळा जेतेपद–ाची ट्रॉफी उंचावली होती. त्यानंतर रोहितला काढून ही जबाबदारी हार्दिक पंड्याकडे देण्यात आली. पण हार्दिक हवी तशी कामगिरी करू शकलेला नाही. पंजाब किंग्ज संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात हार्दिककडून बऱ्याच चुका झाल्या. यावरून माजी भारतीय क्रिकेटपटू मनोज तिवारीने हार्दिक पंड्यावर जोरदार टीका केली आहे.

: मुंबई इंडियन्स ङ्गआऊटफ की अजूनही संधी? पंजाबविरूद्ध मोठ्या पराभवानंतर प्लेऑफसाठी असं आहे नवं समीकरण?मनोज तिवारी म्हणाला, ङ्ग२०२३ मध्येही ट्रॉफी नव्हती, २०२४ मध्येही नव्हती आणि यावेळीही असंच काहीसं होण्याची शक्यता आहे. मला तरी वाटतं की, हार्दिक पंड्याचं नेतृत्व कमकुवत आहे. मला फार कठोर व्हायचं नाही, पण हार्दिकने ज्याप्रकारे संघाचं नेतृत्व करायला हवं, तो तसं करत नाहीये. त्याने कर्णधार म्हणून पुढाकार घेणं खूप गरजेचं आहे.ङ्ख

तसेच रोहित शर्माकडे कर्णधारपद सोपवण्याबाबत बोलताना मनोज तिव–ारी म्हणाला, ङ्गजर मुंबई इंडियन्सला बदल घडवायचा असेल, तर हार्दिकने कर्णधारपदावरून बाजूला होऊन रोहित शर्माकडे सूत्र सोपवली पाहिजेत. कारण रोहितने या संघाला ५ जेतेपदं मिळवून दिली आहेत.ङ्ख

मनोज तिवारीने हार्दिक पंड्याच्या फलंदाजीवरूनही जोरदार टीका केली. तो म्हणाला, ङ्गपंजाब किंग्जविरुद्ध हार्दिकने स्वतःहून फलंदाजीला यायला नको होतं. त्याने १२ चेंडूत अवघ्या १४ धावा केल्या. शेरफेन रुदरफोर्डला फक्त ५ चेंडू खेळण्याची संधी मिळाली. इतके चेंडू जर रुदरफोर्डला मिळाले असते, त्याने ३–४ षटकार मारले असते. हार्दिक पंड्याला वाटलं की तो हे करू शकतो.

## महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कारासाठी २० एप्रिलपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी, कला, समाजप्रबोधन आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना दरवर्षी महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. शासन निर्णय ८ मार्च २०१९ नुसार, प्रतिवर्षी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर एक व्यक्ती व एक संस्था अशा दोन घटकांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

या पुरस्कारासाठी लातूर जिल्ह्यातील पात्र व्यक्ती व संस्थांनी आपले प्रस्ताव विहित नमुन्यात तीन प्रतीत येत्या २० एप्रिल २०२६ पर्यंत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, लातूर यांच्या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे. पुरस्काराचा विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयात उपलब्ध असून अधिक माहितीसाठी इच्छुकांनी प्रत्यक्ष कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## क्रांतिवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारासाठी २० एप्रिलपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कला, समाजप्रबोधन आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना क्रांतिवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार प्रदान करण्याचा शासन निर्णय १३ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आला आहे. या पुरस्कारासाठी लातूर जिल्ह्यातील पात्र साहित्यिक, समाजप्रबोधनकार, समाजसेवक आणि संस्थांनी २० एप्रिल २०२६ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

विहित नमुन्यातील हे प्रस्ताव तीन प्रतीत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, लातूर या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना आणि पुरस्काराच्या अधिक माहितीसाठी इच्छुक व्यक्ती व संस्थांनी प्रत्यक्ष कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

## नटराज व विश्वकर्मा पुरस्कारासाठी २० एप्रिलपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील पारंपरिक लोककलाकार आणि कारागिरांच्या कौशल्याचा गौरव करण्यासाठी नटराज व विश्वकर्मा पुरस्कार देण्याचा शासन निर्णय १३ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आला आहे. या अंतर्गत सामाजिक, कलात्मक व प्रबोधन क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोककलावंतांना नटराज पुरस्कार आणि पारंपरिक कारागिरांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्कारांसाठी लातूर जिल्ह्यातील पात्र लोककलावंत व कारागिरांनी आपले प्रस्ताव २० एप्रिल २०२६ पर्यंत तीन प्रतीत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, लातूर यांच्या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे. अर्जाचा विहित नमुना व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी प्रत्यक्ष कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही प्रशासनाद्वारे कळविण्यात आले आहे.

## अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर बालविवाह रोखण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासन सज्ज, १०९८ क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन




**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक तसेच सामूहिक विवाह सोहळे आयोजित केले जातात. याच पार्श्वभूमीवर, येत्या सोमवारी, २० एप्रिल २०२६ रोजी अक्षय तृतीयेच्या दिवशी जिल्ह्यात संभाव्य बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विविध दिशादर्शक सूचना जारी केल्या आहेत. जिल्ह्यात मागील वर्षभरात (एप्रिल २०२५ ते मार्च २०२६) ६५ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले असून, ही बाब जिल्हा प्रशासनाच्या सतर्कतेचे व समन्वयित कार्यपद्धतीचे द्योतक आहे.

बालविवाह ही प्रथा बालकांच्या मूलभूत हक्कांच्या विरोधात असून, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंतर्गत असे विवाह बेकायदेशीर घोषित करण्यात आले आहेत. बालविवाह आयोजित करणे हा अजामीनपात्र गुन्हा असून, अशा घटना आढळल्यास तातडीने गुन्हा नोंदविणे बंधनकारक आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक, तर शहरी भागात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या अध्यक्षांनी जिल्ह्यात बालविवाह होऊ नयेत यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ राबविण्याचे आदेश दिले आहेत. संभाव्य बालविवाहाची माहिती मिळताच नागरिकांनी त्वरित १०९८ किंवा ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर लातूर जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे आणि स्थानिक पातळीवर व्यापक जनजागृती मोहीम राबवावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संदीप यादव यांनी केले आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील २ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांचा संरक्षा पुरस्कार

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री राजीव श्रीवास्तव यांनी, दि. १५.०४.२०२६ रोजी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित एका समारंभात, सोलापूर विभागातील मध्य रेल्वेच्या २ कर्मचाऱ्यांना 'संरक्षा पुरस्कारा'ने सन्मानित केले.

कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांनी दर्शविलेली सतर्कता, प्रसंगावधान आणि कर्तव्यनिष्ठा यांचा गौरव करण्यासाठी हे सुरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. या गुणधर्मांमुळेच गेल्या काही महिन्यांत संभाव्य अनुचित घटना टळल्या आणि रेल्वेचे सुरक्षित परिचालन सुनिश्चित झाले. प्रत्येक पुरस्कारामध्ये एक पदक, प्रशस्तिपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा गौरव करणारा विशेष उल्लेख (Citation) आणि ३५००/- रुपयांचे रोख बक्षीस यांचा समावेश आहे.


Shri Ramesh Tanmor
Technician(TRD), Dharashiv


Shri Yogendra Kumar
Technician(TRD), Dudhani

पुरस्कार विजेत्यांचा तपशील

– श्री रमेश तनमोर, तंत्रज्ञ (TRD), धाराशिव, सोलापूर विभाग: दि. १७.०२.२०२६ रोजी येडशी–ढोकी विभागात पायी गस्त घालत असताना, त्यांना स्थान क्रमांक ४६४/०९ येथे एका OHE खांबाचा (Mast) 'RRA क्लॅम्प' वाकलेल्या आणि पिळवटलेल्या अवस्थेत दिसून आला. यामुळे जम्पर फिटिंगचा समतोल बिघडून OHE तार तुटण्याची आणि परिणामी एखादी अनुचित घटना घडण्याची शक्यता होती. त्यांची सतर्कता आणि वेळीच केलेल्या कृतीमुळे एक संभाव्य गंभीर दुर्घटना टळली.

– श्री योगेंद्र कुमार, तंत्रज्ञ (TRD), दुधनी, सोलापूर विभाग: दि. २८.०१.२०२६ रोजी दुधनी–वाडी विभागात तपासणीचे कर्तव्य बजावत असताना, त्यांना किमी ५२३/२४ येथे एक 'IR वायर ड्रॉपर' तुटलेल्या आणि लटकलेल्या अवस्थेत दिसून आला. यामुळे रेल्वेच्या सुरक्षित संचालनावर गंभीर परिणाम होत होता. त्यांनी तात्काळ संबंधित सर्व अधिकाऱ्यांना याविषयी माहिती दिली आणि एक संभाव्य अपघात टाळला.

महाव्यवस्थापकांनी पुरस्कार विजेत्यांचे त्यांच्या कर्तव्यनिष्ठेबद्दल आणि सतर्कतेबद्दल अभिनंदन केले. तसेच, त्यांच्या या कृतींमुळे इतर रेल्वे कर्मचाऱ्यांनाही सतर्क राहण्याची आणि प्रवाशांची सुरक्षा व रेल्वे मालमत्तेचे रक्षण सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध राहण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी श्री चंद्र किशोर प्रसाद, विविध विभागांचे इतर प्रधान विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मुंबईतील भोंदूबाबा रिदम पांचाळला अटक; महापालिकेच्या गार्डनमध्ये करायचा अघोरी पूजा

**मुंबई/प्रतिनिधी :** मालाडच्या भोंदूबाबा रिदम पांचाळ याला पोलिसांनी अटक केली आहे. स्थानिकांनी केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी दोन आठवड्यानंतर रिदम पांचाळवर गुन्हा दाखल केला. त्यानंतर दिंडोशी पोलिसांनी भोंदूबाबा रिदम पांचाळला ताब्यात घेऊन त्याची चौकशी करून अटक केली आहे. भोंदूबाबा रिदम पांचाळ दर गुरूवारी आणि रविवारी तो भूत उतरवण्याची बतावणी करत अघोरी पूजा करतो. जादूटोणा, अघोरी पूजा यामुळे त्याच्या आजूबाजूला राहणारे स्थानिक लोक हैराण झाले. त्यामुळे या भोंदूबाबाला अटक करावी अशी मागणी स्थानिकांनी केलीय. आतापर्यंत त्याच्या घरी, घराच्या समोर अशा प्रकारच्या पूजा किंवा अशा प्रकारचे प्रताप तो करत होता. मात्र ४ एप्रिलला त्याने महापालिकेच्या गार्डनमध्ये शेकडो लोकांना बोलून आपली पूजा करत उघडपणे भूत उतरण्याच्या नावाखाली जादूटोण्याचा प्रकार केल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

## डॉ. आंबेडकरांनी शोषीत समाजामध्ये आत्मसन्मान निर्माण करण्याचे काम केले: प्रा.अनिल जायभाये



**लातूर/प्रतिनिधी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलीत, शोषीत समाजामध्ये आत्मसन्मान निर्माण करण्याचे मूलभूत कार्य निर्माण केले. माणसाला सन्मान मीळत नसेल तर अशा समाजातली मुल्यव्यवस्था व धर्म व्यवस्था ही मानवी हिताची ठरू शकत नाही. बाबासाहेबांनी त्यांच्या कार्यातून विषमतेचे समग्र रूप दाखवले. अवघ्या जगाला मार्गदर्शन करणारे काम डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केलं आहे, असे विचार प्रा. अनिल जायभाये यांनी व्यक्त केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ वी जयंती मोहोत्सवा निमित्त ते बोलत होते.

महावितरणच्या वतीने अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, प्रमूख अतिथी म्हणून आवर्जून उपस्थित राहीलेले हास्य अभिनेते अंकूर वाढवे, कार्यकारी अभियंता अनिरूध्द घाटगे, रविंद्र महाव्दार, सहय्यक महाव्यवस्थापक चेतन वाघ, अतिरिक्त कार्यकारी अभियंता धनंजय जाधव, प्रमोद दुधाळे, सहाय्यक अभियंता शिलरत्न सुर्यवंशी, लेखाधिकारी प्रमोद कांबळे कामगार नेते सिध्दार्थ कुसभागे यांच्या प्रमूख उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त परिमंडल कार्यालय येथे आयोजीत जयंती उत्सवात प्रा.अनिल जायभाये बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, बाबासाहेबांनी सातत्याने जातीव्यवस्थेचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्नरत राहीले. स्त्री ही जातीव्यवस्थेचे प्रवेशव्दार आहे असे सांगत स्त्रीयांना अधिकार देत त्यांना सक्षम बनवले हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीमुक्तीचा मार्ग त्यांनी दाखवला. बहूआयामी पैलूंचे धनी असलेल्या बाबासाहेबांचे अत्यंत महत्वाचे जीवन ध्येय असलेले धम्माचा विचार त्यांनी दिला, म्हणूनच त्यांना आपण बोधीसत्व म्हणतो.

मानवी जीवनामध्ये मनाची आणि विचारांची परिपक्वता मिळावी, समतेच्या तत्वावरतीजीवन समृध्द व्हाव यासाठीच धम्माचा विचार दिला. बुध्द, कबीर, संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले तसेच अनेक संतांच्या वाचाराने प्रेरित झालेले बाबासाहेब यांचे समग्र जीवन आपल्याला, येणाऱ्या पिढीला नवी दृष्टी देणारे आहे असेही प्रा.अनलि जायभाये यांनी विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपाचे विचार व्यक्त करताना लातूर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी यांनीही डॉ. आंबेडकरांच्या जीवन तत्वांचा मागोवा घेतला.यावेळी हास्य अभिनेते अंकूर वाढवे यांनी आपल्या आयुष्यावर डॉ आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव असल्यांचे सांगत शिक्षणाची प्रेरणा आपल्याला बाबासाहेबांकडूनच मिळाल्याचे सांगितले.

जयंती उत्सव कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रमोद कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक सिध्दार्थ कुसभागे यांनी केले. तसेच सहाय्यक अभियंता शिलरत्न सुर्यवंशी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशश्रिवतेसाठी जयंती उत्सव समितीचे सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## एसबीआय (करन्सी चेस्ट् बँक) मार्फत जिल्हा बँकेला अपुरा चलन पुरवठा

### रोख रकमेची तात्पुरती टंचाई
### ठेवीदार ग्राहकांनी बँकेला सहकार्य करण्याचे आवाहन
### जिल्हा बँकेच्या ग्राहकांनी डिजिटल माध्यमांचा वापर करावा

**लातूर/प्रतिनिधी :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मार्फत लातूर जिल्ह्यासाठी चलन पुरवठा सुरळीत होन्यासाठी नियुक्त स्टेट बँक ऑफ इंडिया मार्फत अपुऱ्या चलन पुरवठ्यामुळे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालय व सर्व १२२ शाखेत तात्पुरती चलन रोख रक्कमेची टंचाई निर्माण झाली आहे जिल्हा बँकेकडून RBI /SBI याना पाठपुरावा / समन्वय सुरू असून मागणीच्या तुलनेत अत्यंत कमी रक्कम SBI बँकेकडून पुरवठा होत असल्याने ग्राहकांची गैरसोय होत आहे याबाबत लातूर जिल्हा बँकेकडून SBI बँकेकडे तसेच राज्यातील इतर बँकांकडे विनंती करण्यात येत आहे त्यामुळे जिल्हा बँकेच्या ग्राहक/ ठेवीदारांनी बँकेला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा बँकेने केले आहे

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने २ एप्रिल ते १४ एप्रिल पर्यंत चेस्ट् (SBI) बँकेशीवाय इतर बँकेतून चलन प्राप्त करून ग्राहकांना चलन पुरवठा केला आहे परंतु आता महाराष्ट्र कर्नाटक आंध्र तेलंगणा या चारही राज्यात चलन तुटवडा निर्माण झाला आहे यासाठी लातूर जिल्हा बँकेकडून सातत्याने चेस्ट बँकेसह इतर बँकेकडे पाठपुरावा सुरू आहे अल्पावधीतच सुरळीत चलन पुरवठा होईल या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत ग्राहकांना चलन पुरवठा वेळेवर होत नसल्याने दिलगिरी व्यक्त करीत असल्याचे बँकेने प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे

1984
लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमीटेड

ग्राहकांनी तूर्त डिजिटल माध्यमांचा वापर करावा

बँकेला (SBI) चेस्ट् रोख रक्कम चलन पुरवठा होईपर्यंत बँकेच्या खातेदारांनी डिजिटल माध्यमांचा वापर करावा व जिल्हा बँकेस सहकार्य करावे असे आवाहन बँकेकडून करण्यात आले आहे.

# डॉ. अनिल कुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंडच्या वतीने निलंगा तालुक्यातील अनसरवाडा येथे आयोजित सर्वरोग निदान शिबिर व रक्तदान शिबिर

**निलंगा/आयुब बागवान :** डॉ. अनिल कुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंडच्या वतीने निलंगा तालुक्यातील अनसरवाडा येथे आयोजित सर्वरोग निदान शिबिर व रक्तदान शिबिर व चष्मे वाटप मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले. ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



या शिबिरामध्ये विविध आजारांचे तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली या यावेळी हृदयरोग तज्ञ डॉ. श्रीधर अहंकारी डॉ. एस एस शिंदे डॉक्टर मनमत गताटे डॉ. वारद डॉ. पांचाळ इत्यादी डॉक्टरांनी सहभाग नोंदवलात सेच आवश्यक त्या रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. रक्तदान शिबिरात युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अजित माने (नूतन पंचायत समिती सदस्य), अभिजीत उसनाळे (भाजप नेते), नयन माने (सरपंच), किशोर वाघमारे यांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा सामाजिक उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रल्हाद सूर्यवंशी, सुशील पटसाळगे, दत्ता शिंदे, शैलेश सूर्यवंशी, सुधीर पटसाळगे, गुरुनाथ सूर्यवंशी, आनंद कांबळे, दिगंबर पटसाळगे, शुभम सूर्यवंशी, गोविंद सूर्यवंशी, रमेश पटसाळगे, कैलास सूर्यवंशी सोमनाथ पटसाळगे आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

डॉ. अनिल कुमार गायकवाड सेवा कुंडाचे अध्यक्ष अश्वजीत गायकवाड यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला. या शिबिरामुळे अनेक गरजू नागरिकांना आरोग्य तपासणी व उपचारांची संधी मिळाली असून समाजहिताचा आदर्श निर्माण झाला आहे.

## मत्स्यव्यवसाय योजनांच्या लाभासाठी एन.एफ.डी.पी. पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभासाठी जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाशी संबंधित व्यक्ती व संस्थांनी 'राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय डिजिटल प्लॅटफॉर्म' (एनएफडीपी) पोर्टलवर आपली नोंदणी करावी, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहायक आयुक्त श्रीमती तेजस्विनी सिंधू प्रदीप करळे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व वैयक्तिक मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्य विक्रेते, मच्छिमार सहकारी संस्थांचे सभासद आणि मत्स्यउत्पादन शेतकरी संघ यांना विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी या पोर्टलवर नोंदणी असणे अनिवार्य आहे. ही नोंदणी https://nfdp.dpf.gov.in किंवा https://pmmkssy.dof.gov.in या लिंकवर स्वतः किंवा जवळच्या 'सीएससी' केंद्रात जाऊन विनामूल्य करता येईल. नोंदणीसाठी ओळखपत्र आणि बँक पासबुक सोबत असणे आवश्यक आहे.

यासोबतच, ई-श्रम कार्डसाठीची नोंदणी https://eshram.gov.in या लिंकवर करावी. तसेच अपघात गट विमा नोंदणीबाबतची ३३ कॉलमची माहिती आणि 'केसीसी' संदर्भातील कागदपत्रे सहायक आयुक्त कार्यालयात सादर करावीत, असेही श्रीमती करळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातूर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई - प्रतिबंधित गुटखा वाहतूक करणारा जेरबंद, वाहनासह ८.५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरामध्ये प्रतिबंधित अन्न पदार्थ (गुटखा) विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी दिले आहेत. त्याअनुषंगाने अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी उल्लेखनीय व प्रभावी कारवाई करून प्रतिबंधित गुटखा वाहनासह जप्त केला आहे.

पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे १८.०० वाजता गांधी चौक पोलीस स्टेशन हद्दीतील मजगे नगर ते ट्विंकल लॅन्ड इंग्लिश स्कूल या मार्गावरून एक पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिजायर कार (क्रमांक MH-09 CV-9124) मधून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्रीसाठी वाहतूक करण्यात येत आहे अशी माहिती मिळाली. प्राप्त माहितीच्या आधारे पथकाने मजगे नगर ते ट्विंकल लॅन्ड इंग्लिश स्कूल रोडवरील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समोर सापळा रचून संशयित वाहन ताब्यात घेतले. चौकशीअंती चालकाने आपले नाव नागनाथ (वय ४५ वर्ष, रा. मजगे नगर, लातूर) असे सांगितले. वाहनाची झडती घेतली असता गाडीतील सीट मागे व डिकीत पांढऱ्या पोत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आढळून आला. त्यामध्ये विमल पान मसाला अंदाजे १,२४,८००/-,त-१ तंबाखू, अंदाजे ३१,२००/-स्विफ्ट डिजायर कार अंदाजे ७,००,०००/- असा एकूण ८,५६,०००/ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

संबंधिता विरुद्ध पोलीस स्टेशन गांधी चौक, लातूर येथे भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १२३, २७४, २७५, २२३ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकातील पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, पोलीस अंमलदार अर्जुन रजपूत, रियाज सौदागर, साहेबराव हाके, मनोज खोसे, आनंद हल्लाळे यांनी केली आहे.




## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** सहकार महर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त लातूर जिल्हा संस्थाचालक संघाच्यावतीने शनिवार, १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजेपासून बार्शी रोडवरील नवीन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या साने गुरुजी विद्यालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होते. मांजरा परिवाराचे मार्गदर्शक, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन लातूर जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाचे अध्यक्ष रामदास पवार, सचिव प्राचार्य बाबूराव जाधव, कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, कार्याध्यक्ष डी. बी. लोहारे, सरचिटणीस प्रा. गोविंदराव घार, उपाध्यक्ष जे. जी. सगरे, सहसचिव पी. एन. बंडगर, वसंतराव पाटील, प्रकाश देशमुख, कालिदास माने, सदस्य एम. एस. पात्रे, कमलाकर शिंदे, पंडित कदम, व्यंकटराव शिंदे, सी. के. साळुंके, जितेंद्र स्वामी, रणजीत बेल्लाळे, बाळासाहेब पाटील झरीकर, एकनाथ पाटील, प्रा. दिलीप गुंजरगे यांनी केले आहे.

## युरिया व डीएपी विक्रीसाठी लेखी 'स्पष्ट गाईडलाईन्स' द्या

### फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस् ॲण्ड सीडस् डिलर्स असोसिएशनचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना निवेदन

### ऐन पेरणीच्या तोंडावर युरिया व डीएपी विक्री बंद ठेवण्याचा असोसिएशनचा निर्णय

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील सर्व खत विक्रेत्यांनी १७ एप्रिल पासुन युरिया व डीएपी विक्री बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी युरिया व डीएपी विक्री बाबत ची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत आम्ही कोणताही डीएपी व युरिया उतरवून घेणार नाही व विक्री करणार नाही असे निवेदन लातूर जिल्हा कृषि अधिकारी यांना फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस् ण्ड सीडस् डिलर्स असोसिएशन च्या वतीने देण्यात आले आहे.



फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस् ण्ड सीडस् डिलर्स असोसिएशनच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष प्रदीप सोनवणे यांच्या नेतृत्वार गुरुवारी, दि. १६ रोजी लातूर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्या समोर जिल्हयातील युरिया व डीएपी विक्री करताना येणाऱ्या अडचणींचा पाढा वाचला. भावातील तफावत व खत विक्री बाबत स्पष्ट स्वरुपात नसलेल्या गाईडलाईन यामुळे शेतकरी ग्राहक व विक्रेते दुकानदार यांच्यात अनेकदा वाद होतात. यामुळे दुकानदारांना मनस्ताप सहन करावा लागतो. शेतकऱ्यांना योग्य दरात व वेळेवर खत मिळावे यासाठी खत विक्रेते मोठ्या प्रमाणात गुंतवणुक करतात तरी ही अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांना विनाकारण प्रशासकीय कार्यवाहीचा सामना करुन आपला व्यवसाय करावा लागतो असे सांगुन जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी यांनी युरिया व डीएपी विक्री बाबत ची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात दिल्यास शेतकऱ्यांत व दुकानदारांमध्ये वाद होणार नाही. त्याच बरोबर खतांच्या दराबाबत गैरसमज निर्माण होणार नाही. यासाठी प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा व युरिया व डीएपी विक्री बाबत ची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात द्यावी अशी मागणी करणारे निवेदन लातूर जिल्हा कृषि अधिकारी यांना फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस् ण्ड सीडस् डिलर्स असोसिएशन च्यावतीने देण्यात आले आहे.

प्रशासनाकडून युरिया व डीएपी विक्री बाबत ची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात मिळत नाही तोपर्यंत जिल्हयातील सर्व विक्रेते युरिया व डीएपी ची खरेदी व विक्री शुक्रवार दि. १७ एप्रील पासून बंद करावी आहेत असा स्पाष्ट इशारा लातूर जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी यांना निवेदनातू देण्यात आला आहे.

यावेळी गाईडलाईन्स' फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस् ण्ड सीडस् डिलर्स असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रदीप अण्णा सोनवणे, राजाभाऊ शिंदे, सतीश देशमुख, विजय पोपडे, लक्ष्मीकांत बंग, चाकूते सिद्राम, राजेश मद्रेवार, महादू शिरसाट यांच्यासह पदाधिकारी, सदस्य व जिल्ह्यातील व्यवसायीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वर जयंतीदिनी रविवारी लिंगायत महासंघाकडून जिल्हाभर कार्यक्रम

***लातूर/प्रतिनिधी :*** *लिंगायत महासंघाच्यावतीने रविवार दि.१९ एप्रिल २०२६ रोजी महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त जिल्हाभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील व लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष करीबसवेश्वर पाटील यांनी सांगितले. महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त म्हणजे १९ एप्रिल २०२६ रोजी लिंगायत महासंघाकडून लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७.३० वा. सर्वांनी घरी किंवा सार्वजनिक ठिकाणी महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे, पुतळ्याचे पुजन, वंदन व आरती करावी. त्यानंतर प्रसादाचे वाटप सर्वत्र केले जाणार आहे. विविध ठिकाणी रक्तदान शिबीरे, मान्यवरांचा सत्कार, रूग्णांना फळे व प्रसादाचे वाटप, व्याख्यान तसेच महात्मा बसवेश्वर स्मरणिकेचे प्रकाशन तसेच गावागावातून निघणार्या मिरवणूकामध्ये सहभाग असे दिवसभराचे कार्यक्रम होणार असून लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुका व शहर कार्यकारिणीच्या तसेच गाव शाखेच्या पदाधिकार्यांनी समाजबांधवांना सोबत घेवून हा कार्यक्रम उत्साहात व आनंदात साजरा करावा असे आवाहन लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील, जिल्हाध्यक्ष करीबसवेश्वर पाटील यांनी केले आहे.*

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

## उन्हाळा ..

वाढे उन्हाचा पारा
असह्यसा उन्हाळा
अंगाची लाही लाही
उन्हाच्या त्या झळा

जीव हो पाणीपाणी
घाम गळे घळाघळा
उन्हाचा वर्षाव चाले
सावलीत पळापळा

सावलीही बिथरली
उठतो उष्मा धुराळा
सूर्या जावे ढगाआड
कृपा करावी दयाळा

प्राणी पक्षी बिथरले
शोधीसारे पाणथळा
बोलताही येत नाही
कशासांगाव्या कळा

माणूस जातआपली
यावा जरा कळवळा
पाणीठेव जागोजाग
मानवा हो कनवळा

देती मूक धन्यवाद
ओला हो बरा गळा
साथ देता एकमेकां
उन्हाळा हा आगळा

आवश्यक उन्हाळा
हवा बरा पावसाळा
सोसता दुःख झळा
येई उत्साह उसाळा

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

## डीजे चालक, मालक व जयंती मंडळ पदाधिकाऱ्यांवर एकूण ०७ गुन्हे दाखल, १५ जनाविरुद्ध प्रस्ताव सादर

### ध्वनी प्रदूषणाविरुद्ध लातूर पोलिसांची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात मिरवणुका व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जयंतीनिमित्त संपूर्ण जिल्हाभरात विविध जयंती मंडळांनी अतिशय उत्साहाने सांस्कृतिक कार्यक्रम, रक्तदान शिबिर, देखावे, व्याख्याने तसेच इतर चांगल्या उपक्रमातून जयंती साजरी करण्यात आली. जयंती मधून जिल्हाभरात अतिशय शांतता आणि सभ्यता याचे अखंड दर्शन घडवीत जयंती मंडळ व नागरिकांनी अतिशय उत्साहात प्रशासनाचे सर्व नियम पाळून आणि सहकार्य करून जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता.

सदर जयंती मिरवणूक कार्यक्रमादरम्यान ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाकडून विशेष वेळोवेळी आवाहन करण्यात आले होते. या संदर्भाने संबंधित जयंती मंडळांना पूर्वसूचना देऊन नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे जिल्हाभरातील सर्व जयंती मंडळाने दिलेल्या आव्हानाला सकारात्मक प्रतिसाद देऊन जयंती मिरवणुका उत्साहात काढून कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होता शांततेत पार पाडून प्रशासनास सहकार्य केले. मात्र काही अपवादात्मक ठिकाणी नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने पोलीसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित डीजे चालक, मालक व जयंती मंडळ पदाधिकाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २२३, २९२ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५, १३६ व ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम अन्वये एकूण ०७ गुन्हे दाखल केले आहेत. तर १५ जयंती समिती व डीजे चालकाविरुद्ध सविस्तर प्रस्ताव तयार करून पाठविण्यात आले आहे.

पोलीस स्टेशननिहाय गुन्हे दाखल करण्यात आलेल्याची माहिती.
०१. उदगीर शहर – ०५ गुन्हे
०२. अहमदपूर– ०१ गुन्हा
०३. किनगाव– ०१ गुन्हा
असे एकूण सात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ध्वनी प्रदूषण करणारे खालील मंडळे, डीजे चालकाविरुद्ध सविस्तर प्रस्ताव तयार करून सक्षम प्राधिकार्याकडे पाठविण्यात येत आहे.
०१. पोलीस स्टेशन शिवाजीनगर – ०४ प्रस्ताव
२. पोलीस स्टेशन गांधी चौक – ०४ प्रस्ताव
३. पोलीस स्टेशन विवेकानंद चौक – ०४ प्रस्ताव
४. पोलीस स्टेशन एमआयडीसी– ०२ प्रस्ताव
५. पोलीस स्टेशन चाकूर –०१ प्रस्ताव

याप्रमाणे ध्वनी प्रदूषण करणाऱ्या जयंती समिती पदाधिकारी डीजे चालक-मालक यांच्यावर कारवाई करण्यात आले असून मशीन द्वारे ध्वनी पातळी (डेसिबल) मोजणी करून करण्यात आली आहे तसेच काही ठिकाणी डीजे साहित्य जप्त करून पुढील तपास व कारवाई सुरू आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व जयंती मंडळांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम व उपक्रम घेऊन अतिशय उत्साहात प्रशासनास सहकार्य करून जयंती साजरी केली. परंतु लातूर जिल्हा पोलीस दलाकडून नागरिकांना वारंवार सूचना देऊनही काही अपवादात्मक मंडळांकडून नियमांचे उल्लंघन झाल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य, शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहतील. सर्व नागरिक व आयोजकांनी शासन नियमांचे पालन करून सण-उत्सव शांततेत व कायद्याच्या चौकटीत साजरे करावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

### ग्रामपंचायत कार्यालय जाऊ, ता निलंगा जि लातूर

#### संगणक चालक (ऑपरेटर) भरती बाबत

परिसरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते कि मौजे जाऊ, ता. निलंगा. जि.लातूर येथील ग्रामपंचायत मध्ये संगणक चालक (ऑपरेटर) पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. तरी ज्या नागरिका संगणक चालक (ऑपरेटर) या पदासाठी इच्छूक आहेत त्यांनी अर्ज करावा. सदरील पदासाठी नागरिकांनी आठ दिवसापर्यंत कमीत कमी सातवी ते नववी उत्तीर्ण. असलेल्या वरील पदासाठी मूळ कागदपत्रासह ग्रामपंचायत कार्यालय जाऊ येथे हजर राहावे. असे कळविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| **सरपंच** | **ग्रामसेवक** |
| **ग्रा. प. कार्यालय जाऊ** | **ग्रा. प. कार्यालय जाऊ** |
| **ता. निलंगा जि. लातूर** | **ता. निलंगा जि. लातूर** |

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६